POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-२३१ ● मुंबई, बुधवार, २५ मार्च २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## मुंबईत अग्नितांडव! मिरा-भाईंदरमध्ये 5 इमारतींना लागली आग

■ बातमी /लेख,
प्रीती दिपक नाईक

मुंबईतून मोठी बातमी समोर येत आहे. मिरा-भाईंदरमधील प्लेझंट पार्क परिसरात भीषण आग लागल्याची घटना समोर आली असून, या आगीने काही वेळातच विक्राळ रूप धारण केले. परिसरातील चार ते पाच इमारती या आगीच्या विळख्यात सापडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आग इतक्या वेगाने पसरली की काही घरांनाही तिचा फटका बसला. घटनेनंतर परिसरात धुराचे प्रचंड लोट पसरले असून वातावरण अत्यंत धोकादायक बनले आहे.



**आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न सुरू**

मिरा-भाईंदरमधील प्लेझंट पार्क परिसरात लागलेल्या आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या अनेक गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या असून, आग नियंत्रणात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत. ही आग आटोक्यात आणण्यासाठी गेल्या काही तासांपासून प्रयत्न सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीती आणि चिंतेचे वातावरण पसरले असून, प्रशासनाने परिसर सुरक्षित करण्यासाठी खबरदारीचे उपाय सुरू केले आहेत.

**अंधेरीतही इमारतीला लागली आग**

अंधेरी पश्चिम येथील लोखंडवाला कॉम्प्लेक्समध्ये इमारतीच्या ९व्या मजल्यावर आग लागली आहे. मेघदूत बिल्डिंच्या बी विंगला ही आग लागली असल्याचे समोर आले आहे. ग्राउंड प्लस 22 मजली इमारतीच्या ९व्या मजल्यावरही आग लागली आहे. घटनेची माहिती समजताच मुंबई अग्निशमन दलाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. पोलिस, रुग्णवाहिका आणि वॉर्ड स्टाफही घटनास्थळी दाखल झाले आहेत. सध्या आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

**मोठे आर्थिक नुकसान**

आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, काही प्राथमिक माहितीनुसार गॅस सिलिंडर स्फोटाची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे आजूबाजूच्या इतरही इमारतींना मोठा धोका निर्माण झाला आहे. या आगीत दोन ते तीन टेम्पोचे सुद्धा नुकसान झाल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेत कोणत्याही जीवितहानीची माहिती समोर आली नसली तरी मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

**कल्याणमध्येही आगीची घटना**

कल्याण पूर्वेतील मॉडेल कॉलेज परिसरात टपऱ्यांना भीषण आग लागल्याचे समोर आले आहे. चिंचपाडा रोडवरील मॉडेल कॉलेज परिसरात ही घटना घडली आहे. अचानक लागलेल्या आगीमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. यामुळे विद्यार्थ्यांची एकच धावपळ पहायला मिळाली, तसेच कॉलेज परिसरात गोंधळ पहायला मिळाला. अग्निशमन दलाने घटनास्थळी दाखल होऊन आगीवर नियंत्रण मिळवले. सुदैवाने कोणतीही जीवितहानी नाही झाली नाही.

## मॉरिशसमध्ये उभारणार महाराष्ट्र भवन

### भूमिपूजन सोहळा संपन्न, मराठी संस्कृतीचा जागतिक विस्तार

■मुंबई। प्रतिनिधी,

मराठी संस्कृतीचा जागतिक विस्तार होणार आहे. मॉरिशसमधील मोका येथे 'महाराष्ट्र भवन' उभारण्यात येणार आहे. विस्तारित इमारतीचा भूमिपूजन सोहळा पार पडला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने हा विस्तार प्रकल्प सुरू करण्यात आला असून, त्यासाठी सुमारे ८ कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे.

महाराष्ट्र आणि मॉरिशस यांच्यातील ऐतिहासिक सांस्कृतिक संबंध अधिक दृढ करण्याचा संदेश देत, स्थानिक मराठी समाजाच्या मोठ्या संख्येने सदस्यांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला. भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत पार पडला. महाराष्ट्र आणि मॉरिशस यांच्यातील संबंध केवळ राजनैतिक नसून भावनिक आणि सांस्कृतिकही आहेत. सात समुद्रांपलीकडे राहत असूनही, येथील मराठी समाज अभिमानाने आपल्या परंपरा, भाषा आणि संस्कृती जपतो, ही बाब अत्यंत प्रेरणादायी आहे असे रवींद्र चव्हाण म्हणाले.



मॉरिशसच्या दोन दिवसीय दौऱ्यादरम्यान रवींद्र चव्हाण यांनी अनेक वरिष्ठ नेत्यांची भेट घेतली. त्यांनी मॉरिशसचे राष्ट्रपती धरमबीर गोखुल यांची सदिच्छा भेट घेतली, जिथे भारत-मॉरिशस संबंध, नील अर्थव्यवस्था, पर्यटन, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सायबर सुरक्षा यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा झाली. राष्ट्रपती धरमबीर गोखुल यांनी भारताला "मॉरिशसचा मोठा भाऊ" असे संबोधून पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाची प्रशंसा केली.

## मिरा-भाईंदरमध्ये गॅस एजन्सीबाहेर नागरिकांच्या रांगा

■भाईंदर। प्रतिनिधी,

मिरा-भाईंदर शहरात सध्या घरगुती गॅस सिलिंडरचा प्रचंड तुटवडा निर्माण झाला असून, सर्वसामान्य नागरिकांचे हाल होत आहेत. शासनाकडून गॅस सिलिंडर बुकिंगनंतर चार दिवसांत घरपोच मिळेल, असा दावा केला जात असला तरी प्रत्यक्षात मात्र नागरिकांना आठवडाभर वाट पाहूनही रिकाम्या हाताने परतावे लागत आहे.


मिरारोड येथील देव मोगरा गॅस एजन्सी बाहेर सध्या रोजच शेकडो नागरिकांच्या रांगा पाहायला मिळत आहेत. वेळेवर सिलिंडर मिळत नसल्याने नागरिक स्वतः एजन्सीवर धाव घेत आहेत. मात्र, तिथेही तासनतास ताटकळत उभे राहूनही अनेकांना रिकाम्या हाती फिरावे लागत असल्याने संताप व्यक्त केला जात आहे. गॅस पुरवठा खंडित झाल्यामुळे



शहरातील अनेक कुटुंबांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. गेल्या ४-५ दिवसांपासून घरात गॅस नसल्याने अनेक कुटुंबांना बाहेरून जेवण मागवावे लागत आहे. वाढत्या महागाईच्या काळात हॉटेलमधील जेवण सामान्यांना परवडणारे नसल्याने नागरिकांवर दुहेरी आर्थिक ताण पडत आहे. एजन्सीकडे विचारणा केली असता समाधानकारक उत्तरे मिळत नसल्याचे नागरिक सांगत आहेत. तसेच हॉटेल चालकांना कमर्शियल गॅस मिळत नसल्यामुळे अनेक हॉटेल बंद झाली आहेत. काही हॉटेल चालकांनी इलेक्ट्रिक शेगड्या आणल्या आहेत तर काहींनी कोळशावर चालणाऱ्या शेगड्या आणल्या आहेत. त्यामुळे काही प्रमाणात हॉटेल चालू आहेत. रस्त्यावरील व्यासायिकांनी देखील गॅस मिळत नसल्याने धंदे बंद ठेवले आहेत. काहींनी जास्त दराने गॅस सिलिंडर विकत घेतल्याने दर वाढ केली आहे. त्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. पुरवठ्यातील अडचणी किंवा लॉजिस्टिक समस्यांमुळे हा उशीर होत असल्याचे एजन्सीकडून सांगण्यात येत आहे, परंतु अधिकृतपणे कोणतीही स्पष्टता देण्यात आलेली नाही. या गोंधळामुळे नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी असून, प्रशासनाने या विषयात तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी जोर धरत आहे.

## फेरीवाल्यांच्या ओळखीची कसून पडताळणी करा

### हायकोर्टाचे बीएमसी, पोलिसांना सक्त निर्देश



■मुंबई। प्रतिनिधी,

शहरातील अनधिकृत फेरीवाल्यांच्या समस्येवर उच्च न्यायालयाने सोमवारी कठोर भूमिका घेतली. शहर आणि उपनगरांतील सर्व फेरीवाले आणि त्यांच्या मदतनीसांच्या ओळखीची कसून पडताळणी करा, असे सक्त निर्देश न्यायालयाने मुंबई महानगरपालिका आणि पोलिसांना दिले.

आपल्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात हयगय केल्यास संबंधित अधिकाऱ्यांना वैयक्तिकरित्या जबाबदार धरले जाईल, असा इशाराही न्यायालयाने यावेळी दिला.

**न्यायालयाचे निरीक्षण**

विविध याचिकाकर्ते सतत कायदेशीर मार्ग पत्करत आहेत. त्यामुळे 'स्ट्रीट व्हेंडर्स ॲक्ट'ची अंमलबजावणी आजतागायत होऊ शकलेली नाही. 'आझाद हॉकर्स' खटल्यात निकाल दिल्यानंतरही या न्यायालयाने विविध प्रकरणांमध्ये जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे आणि सर्व निर्देशांचे आजपर्यंत पालन झालेले नाही. ही वस्तुस्थिती रेकॉर्डवर उपलब्ध आहे.

सदर आदेशाच्या अंमलबजावणीला स्थगिती देण्यास आम्ही इच्छुक नाही, असे खंडपीठाने स्पष्ट केले.

## मिरा-भाईंदर पालिकेचा कर वसुलीचा २४३ कोटींचा टप्पा पार



**थकबाकीदारांविरोधात कडक पावले**

एकीकडे प्रामाणिक करदात्यांचे कौतुक होत असतानाच, दुसरीकडे थकबाकीदारांविरोधात प्रशासनाने कडक पावले उचलली आहेत. थकबाकी असलेल्या मालमत्तांना नोटिसा बजावणे, मालमत्ता जप्त करणे आणि नळजोडणी खंडित करण्याची मोहीम युद्धपातळीवर सुरू करण्यात आली आहे. कारवाई टाळण्यासाठी नागरिकांनी तात्काळ कर भरणा करावा, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

■भाईंदर। प्रतिनिधी,

मिरा-भाईंदर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचा स्रोत असलेल्या मालमत्ता कर वसुलीत मिरा-भाईंदर महापालिकेने मोठी झेप घेतली आहे. २३ मार्च पर्यंत महापालिकेने २४३ कोटी ४० लाख ६८ हजार ४४८ इतका मालमत्ता कर वसूल केला आहे. विशेष म्हणजे, यंदा नागरिकांनी रांगांमध्ये उभे राहण्यापेक्षा डिजिटल पद्धतीला पसंती दिली असून, निम्म्याहून अधिक कर हा ऑनलाईन माध्यमातून जमा झाला आहे.

मिरा- भाईंदर महापालिकेने कर भरण्याची प्रक्रिया सुलभ केल्यामुळे ऑनलाईन भरणा करणाऱ्यांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. आकडेवारीनुसार १,५९,४६४ मालमत्ता धारकांनी ऑनलाईन १२८ कोटी ९१ लाख ९७ हजार ४८७ कर भरला आहे. १,४४,७६८ मालमत्ता धारकांनी ऑफलाईन रोख व धनादेश याद्वारे ११४ कोटी ४८ लाख ७० हजार ९६१ कर भरला आहे. यावरून वेळेची बचत आणि पारदर्शकतेमुळे नागरिक ऑनलाईन सुविधेचा वापर मोठ्या प्रमाणात करत आहेत. महापालिकेच्या सहा प्रभाग समित्यांपैकी प्रभाग समिती क्रमांक ४ ने सर्वाधिक ८९.७२ कोटींची वसुली करत आघाडी घेतली आहे. प्रभाग समिती क्रमांक १ मध्ये २७ कोटी २९ लाख ५९ हजार १४८ रुपए, प्रभाग समिती क्रमांक २ मध्ये ९ कोटी ३६ लाख ९६ हजार ९५४ रुपए , प्रभाग समिती क्रमांक ३ मध्ये २६ कोटी ४० लाख ९९ हजार १४२ रुपये, प्रभाग समिती क्रमांक ४ मध्ये ८९ कोटी ७२ लाख ९३ हजार ५२८ रुपये, प्रभाग समिती क्रमांक ५ मध्ये २० कोटी ३८ लाख तर प्रभाग समिती क्रमांक ६ मध्ये ६२ कोटी ९९ लाख ९२ हजार ४७४ रुपये इतकी वसुली करण्यात आली आहे.

## पुणे, पिंपरी-चिंचवड पालिकांवर कारवाई

### प्रक्रिया न करता शहरातील सांडपाणी सोडले



**'जायका'च्या सहकार्याने नवीन केंद्रांची उभारणी सुरू**

पुणे महानगरपालिकेच्या सांडपाणी प्रक्रियेची क्षमता वाढवण्यासाठी सध्या ४७७ एमएलडी क्षमतेची ९ शुद्धीकरण केंद्रे कार्यरत आहेत तसेच जपान इंटरनॅशनल को-ऑपरेशन एजन्सी (जायका)च्या सहकार्याने नवीन केंद्रांची उभारणी सुरू असून काही प्रकल्प २०२६ पर्यंत पूर्ण होण्याचे नियोजन आहे. नव्याने समाविष्ट गावांसाठीही मलनिःसारण प्रकल्प 'अमृत २.०' अंतर्गत राबवण्यात येत आहेत, अशी माहिती देण्यात आली. दरम्यान, उजनी, जायकवाडी अशा मोठ्या धरणासह कुकडी सारख्या छोट्या धरणातील गाळ काढण्यासाठी शासन पातळी धोरण ठरवण्यात येईल आणि कुकडी धरणातील गाळ काढण्यासाठी कार्यवाही करण्यात येईल, असेही ते म्हणाले.

■पुणे। प्रतिनिधी,

नदीच्या नैसर्गिक पाणी प्रवाहामध्ये प्रक्रिया न करता शहरातील सांडपाणी सोडल्याने शेतीला दूषित पाणी मिळत असल्याने पुणे व पिंपरी चिंचवड महापालिकावर दंडात्मक कारवाईसाठी निर्णय घेण्यात येईल, अशी माहिती मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी विधानसभेत दिली.

हवेली तालुक्यातील नदी तीरावरील शेतीला दूषित पाणी मिळत असल्यासंदर्भात आमदार ज्ञानेश्वर कटके यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती. यावर जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी उत्तर दिले. जलसंपदा मंत्री विखे-पाटील म्हणाले, वाढत्या पाणी वापरावर नियंत्रण ठेवणे आणि सांडपाणी प्रक्रिया क्षमता वाढवणे ही काळाची गरज ठरत आहे. शेतकऱ्यांना शेतीस योग्य प्रक्रिया केलेले पाणी उपलब्ध होईल यासाठी कार्यवाही करण्यात येईल.

**सांडपाणी थेट मुळा-मुठा नदीत सोडले जाते**

पुणे शहरात मोठ्या प्रमाणात सांडपाणी निर्माण होत असून या सांडपाण्यापैकी ६.२० टीएमसीवर प्रक्रिया केली जाते. उर्वरित सांडपाणी थेट मुळा-मुठा नदीत सोडले जात असल्याने नदी प्रदूषित होत आहे. नियमांनुसार सांडपाण्यावर पूर्ण प्रक्रिया करूनच ते नैसर्गिक प्रवाहात सोडणे बंधनकारक आहे. अन्यथा दुप्पट दराने आकारणीसह दंडाची तरतूद करण्यात आलेली आहे. या पार्श्वभूमीवर, महापालिकेला सूचना देण्यात येत आहे असे मंत्री विखे-पाटील म्हणाले.

## 'राजमाता जिजाऊ' बस सेवेचा शुभारंभ

### राज्य परिवहन महामंडळामुळे ३,००० नव्या गाड्यांमुळे राज्यातील सार्वजनिक वाहतुकीला चालना

■मुंबई। प्रतिनिधी,

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने सार्वजनिक वाहतुकीत मोठा टप्पा गाठत ३,००० अत्याधुनिक बसांचा शुभारंभ केला आहे. 'राजमाता जिजाऊ' या नावाने सुरू करण्यात आलेल्या या नव्या सेवेमुळे राज्यातील प्रवाशांना अधिक सुरक्षित, आरामदायी आणि जलद प्रवासाचा अनुभव मिळणार आहे.

**'राजमाता जिजाऊ' नावामागची प्रेरणा**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेरणास्थान असलेल्या जिजाबाईच्या सन्मानार्थ या बसेसना त्यांचे नाव देण्यात आले आहे, जे वारसा आणि मातृशक्तीच्या भावनेचे प्रतीक आहे.

**प्रवाशांच्या सोयीसाठी आधुनिक सुविधा**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या बससेवेचा भव्य शुभारंभ पार पडला. या वेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्यासह अनेक मंत्री, आमदार आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. ढोल-ताशांच्या गजरात आणि लेझीमच्या तालावर पार पडलेल्या या सोहळ्याने कार्यक्रमाला विशेष रंगत आणली.

नव्या बसांमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला असून प्रवाशांच्या सुरक्षितता आणि आरामावर विशेष भर देण्यात आला आहे. सुधारित सुविधा आणि अधिक वेगवान सेवेमुळे एसटी प्रवास अधिक सोयीस्कर होणार असून दैनंदिन प्रवाशांना याचा मोठा फायदा होणार आहे.

**ग्रामीण-शहरी संपर्क अधिक मजबूत**

यामुळे ग्रामीण आणि शहरी भागांमधील दळणवळण अधिक सुलभ होणार आहे. काम, शिक्षण आणि आरोग्य सेवांसाठी प्रवास करणाऱ्या नागरिकांसाठी अधिक नियमित आणि विश्वासार्ह सेवा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे राज्याच्या एकूण विकासाला चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

**प्रवासी-केंद्रित सेवेकडे मोठे पाऊल**

३,००० नव्या गाड्यांचा समावेश हा एसटी सेवेला नवी ऊर्जा देणारा टप्पा मानला जात आहे. 'शिवनेरी', 'शिवशाही', 'शिवाई', 'हिरकणी' आणि 'यशवंती' या सेवांच्या परंपरेत 'राजमाता जिजाऊ' ही आणखी एक महत्त्वाची भर ठरणार आहे. सार्वजनिक वाहतूक अधिक आधुनिक, कार्यक्षम आणि प्रवासी-केंद्रित बनवण्याच्या दिशेने राज्य सरकारचे हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

## 10 वर्षीय चिमुकलीवर एका 58 वर्षीय वृद्धकडून अत्याचार

■मुंबई। प्रतिनिधी,

ठाणे जिल्ह्यात एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. एका 10 वर्षीय चिमुकलीवर एका 58 वर्षीय वृद्ध पुरुषाने लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. या प्रसंगी आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी प्रकरण समजून घेऊन परिसरात संतापाची लाट उसळली. ठाणे जिल्ह्यात एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. एका 10 वर्षीय चिमुकलीवर एका 58 वर्षीय वृद्ध पुरुषाने लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. या प्रसंगी आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी प्रकरण समजून घेऊन परिसरात संतापाची लाट उसळली आणि चिंतेचे वातावरण पसरलं आहे. हा केवळ गुन्हा नसून, समाजाची काळी बाजू समोर आल्याचं समजतंय. या घटनेनं पीडितेच्या कुटुंबाला मोठा धक्का बसला आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरु केला असून, आरोपीच्या भूमिकेची कसून चौकशी केली जात आहे. ही संपूर्ण घटना ठाणे जिल्ह्यातील भोईवाडा पोलीस ठाणे हद्दीत घडल्याचे सांगण्यात येत आहे. पोलिसांच्या म्हणण्यांनुसार, आरोपीने मुलीला काहीतरी बहाणा करून आपल्या घरी बोलावले आणि तिथेच तिच्यावर घृणास्पदपणे कृत्य केल्याची माहिती आहे. संबंधित घटना ही डिसेंबर 2025 ते फेब्रुवारी 2026 दरम्यान भिवंडीच्या निझामपुरा भागातील आरोपीच्या घडली घडली. 58 वर्षीय आरोपीने मुलीला घरी बोलावून तिच्याशी अश्लील कृत्य केल्याची माहिती आहे. यामुळे हे प्रकरण अत्यंत गंभीर बनते.

## मालाडमध्ये हिंदू मुलींवर हल्ला प्रकरण

### आतापर्यंत किती जणांना अटक?

■मुंबई। प्रतिनिधी,

अहमदाबादहून मुंबईत आलेल्या हिंदू मुलींवर झालेल्या हल्ल्याप्रकरणी कुरार पोलिसांनी 7 आरोपींना अटक केली आहे. शिवसेना नेते संजय निरुपम यांनी आरोपींना कठोर शिक्षा देण्याची मागणी करण्यासाठी कुरार पोलीस अधिकाऱ्यांची भेट घेतली.अहमदाबादहून आपल्या नातेवाईकांना भेटायला मुंबईत आलेल्या दोन हिंदू



मुलींना मालाड पूर्वमध्ये रिक्षात बसण्यावरून झालेल्या वादातून काही मुस्लिम मुली आणि तरुणांनी मारहाण केली होती.

घटनेनंतर कुरार पोलिसांनी 10 ते 12 जणांविरुद्ध एफआयआर दाखल केला होता, ज्याअंतर्गत पोलिसांनी सात जणांना अटक केली असून त्यात मुलींचाही समावेश आहे. घटनेची माहिती मिळाल्यानंतर, शिवसेना नेते संजय निरुपम दोन दिवसांपूर्वी तिथे गेले होते आणि त्यांनी सर्व आरोपींना अटक करण्याचा पोलिसांना इशारा दिला होता. आज पुन्हा एकदा संजय निरुपम पोलीस ठाण्यात पोहोचले आणि अटक केलेल्या आरोपींना कठोर शिक्षा देण्याची मागणी केली.

**कुरारच्या पठाणवाडीमधून काही मुलं तिथे आली**

मालाड रेल्वे स्टेशनजवळ शेअर रिक्षात बसण्याच्या क्षुल्लक भांडणावरुन इतका मोठा हा वाद झाला. संध्याकाळच्यावेळी या मुलींचं रिक्षात बसण्यावरुन एका मुस्लिम महिलेसोबत वाद झाला. गुजरातवरुन आलेलं हे कुटुंब शॉपिंगसाठी मालाड येथे गेलं होतं. शेअर ऑटोसाठी ते रांगेत थांबलेले. या कुटुंबाच्या जवळच्या एका महिलेने सांगितलं की, मुली रांगेत पुढे उभ्या होत्या. बुरखा परिधान केलेल्या महिलेची आणि त्यांची तिथे वादावादी झाली. या शाब्दीक भांडणाचं पुढे मोठ्या वादावादीत रुपांतर झालं. कुरारच्या पठाणवाडीमधून काही मुलं तिथे आली आणि वाद आणखी भडकला.

## 3000 खासगी व्हिडिओ... डॉक्टर एकतर्फी प्रेमप्रकरणात अटक

■मुंबई। प्रतिनिधी,

गुजरातच्या राजकोटमध्ये क्लिनिकमध्ये स्पाय कॅमेरा वापरून महिला डॉक्टरांसोबतच्या खाजगी क्षणांचे व्हिडिओ रेकॉर्ड केले. याचप्रकरणी डॉक्टर आणि स्थानिक पत्रकारांविरुद्ध सायबर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी मुख्य आरोपी डॉ. कमल नंदा यांना अटक केली आहे.

**डॉ. कमल नंधा यांच्यासह इतर 12 आरोपींवर कारवाई**

राजकोट सायबर क्राईमचे एसीपी चिंतन पटेल यांनी सांगितलं की, 20 मार्च रोजी राजकोट शहर सायबर क्राइम पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. भारतीय संहिता कलमान्वये 308 (5), 308 (4), 35 (2), 356 (3), 54 आणि 61 तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलम 66 (ए) 67 आणि 67 (अ) अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणात डॉ. कमल नंधा यांच्यासह इतर 12 आरोपींचा समावेश असल्याची माहिती आहे.

**डॉक्टरने गुप्त कॅमेऱ्यातून तब्बल 3 हजारांहून अधिक व्हिडिओ रेकॉर्ड केली**

प्राथमिक तपासातून असे समोर आले की, या डॉक्टरने गुप्त कॅमेऱ्यातून तब्बल 3 हजारांहून अधिक व्हिडिओ रेकॉर्ड करून ठेवले होते आणि स्थानिक पत्रकारांद्वारे पैशांची मागणी करत होता. सध्या 11 खंडणीखोर फरार असून, पुराव्यांच्या आधारे त्यांना पकडण्यासाठी पुढील तपास करण्यात आला आहे.






# संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

## तस्करांवर 'मकोका' पण तस्करीत वाढ!



सध्या चालू असलेल्या महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात तारांकित प्रश्न आणि लक्षवेधी सूचना आदी विविध आयुधांचा उपयोग करून राज्यातील अमली पदार्थांच्या तस्करीला प्रतिबंध घालण्याचा विषय विधीमंडळामध्ये चचेर्ला आला. यावर गृह विभागाने जी आकडेवारी मांडली, ती महाराष्ट्राच्या भविष्यासाठी चिंताजनक आहे. वर्ष २०२५ मध्ये राज्यात १ सहस्र ३४० कोटी रुपयांचे अमली पदार्थ पकडण्यात आले आणि या प्रकरणांत ५ सहस्र ३०७ आरोपींना अटक करण्यात आली, म्हणजे राज्यात सरासरी प्रतिमास ११० कोटी रुपयांचे अमली पदार्थ पकडले गेले आहेत. जे अमली पदार्थ पकडले गेले नाहीत, त्यांची आकडेवारी याच्या कितीतरी पटीने अधिक असेल. राज्यात वेगाने फोफावणाऱ्या अमली पदार्थांच्या प्रभावाचे हे आकडे बोलके उदाहरण होय. काही वर्षांपूर्वी पंजाबमधील अमली पदार्थांच्या विळख्याविषयी 'उडता पंजाब' चित्रपट प्रदर्शित झाला. या चित्रपटामध्ये अमली पदार्थग्रस्त पंजाबचे भयावह चित्रण आहे. त्या दिशेने महाराष्ट्र वेगाने जात आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'महाराष्ट्रामध्ये अमली पदार्थ बनवण्याचे कारखाने चालू असून ते थेट विदेशातून चालवले जात असल्याचे आढळून आले आहे', असे विधानसभेत सांगितले. हस्तकांच्या साहाय्याने अमली पदार्थांचा व्यापार ही काही नवीन गोष्ट नाही; परंतु पूर्वी देशाबाहेरून येणारा हा धोका राज्यातच मोठ्या प्रमाणात निर्माण केला जात आहे, ही महाराष्ट्राची ओळख होऊ नये. अमली पदार्थांची तस्करी भारताच्या बाहेरून होत होती. सद्यःस्थितीत अमली पदार्थांची निर्मितीच महाराष्ट्रात होत आहे, हे गंभीर आहे. वर्ष २०२६ च्या अडीच मासांमध्ये राज्यात २० कोटी रुपयांचे 'मॅफेड्रोन' आणि 'अल्प्राझोलम' हे अमली पदार्थ धाडीत पकडण्यात आले. यापूर्वी अमली पदार्थांच्या तस्करीचे मुख्य केंद्र हिंदी चित्रपटसृष्टी होते. सद्यःस्थितीत मात्र अमली पदार्थांचा प्रभाव सर्वच स्तरांवर झाला आहे. मागील वर्षात महाराष्ट्रामध्ये करण्यात आलेल्या कारवायांमध्ये अमली पदार्थांच्या तस्करीसाठी विद्यार्थ्यांचा उपयोग करण्यात येत असल्याचीही धक्कादायक माहिती उघड झाली आहे. त्यामुळे अमली पदार्थांचा उपयोग हा केवळ उच्चभ्रूंपुरता मर्यादित राहिलेला नाही. वाढते गुन्हेगारीकरण ही अमली पदार्थांच्या तस्करीची दुसरी भयावह बाजू आहे. अमली पदार्थांच्या खरेदीसाठी मोठ्या प्रमाणात लागणारे पैसे चुकीच्या मार्गाने कमवले जातात. त्यामुळे अमली पदार्थांचा वाढता वापर याचा दुसरा अर्थ घरफोड्या, आर्थिक फसवणूक, बलात्कार, हत्या यांचा वाढता आलेख होय. त्यामुळे येत्या काळात अमली पदार्थ तस्करांवर कठोर कारवाई झाली नाही, तर सामाजिक संघर्ष, अनैतिकता आणि गुन्हेगारी यांचे प्रमाण अधिक वेगाने वाढेल. अमली पदार्थांची तस्करी रोखण्यासाठी महाराष्ट्र सरकारने हा गुन्हा 'महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी प्रतिबंध कायद्या'च्या ('मकोका'च्या) अंतर्गत आणला आहे आणि मागील वर्षभरात त्या अंतर्गत गुन्हेही नोंदवण्यात आले आहेत. अमली पदार्थांच्या तस्करीला प्रतिबंध घालण्याच्या दृष्टीने, हे एक परिणामकारक पाऊल आहे. अमली पदार्थांची साखळी तोडण्यासाठी एखाद्या तस्कराला पकडल्यानंतर त्याचा पुरवठादार आणि त्यांचे ग्राहक या साखळीचा शोध घेण्याचे धोरण राज्याच्या गृह विभागाने अवलंबले आहे. त्याचाच परिणाम मागील २ वर्षांत अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांवर कारवाईचे प्रमाण वाढले आहे; परंतु त्यानंतरही अमली पदार्थांच्या तस्करीचे प्रकार थांबल्याचे दिसत नाही. याच्या अनेक कारणांपैकी एक कारण, म्हणजे या तस्करीतील पोलिसांचा सहभाग होय. वर्ष २०२२ ते २०२५ या ३ वर्षांच्या कालावधीत अमली पदार्थांच्या तस्करीत सहभाग असलेल्या १५ पोलिसांना कामावरून कायमस्वरूपी काढण्यात (बडतर्फ करण्यात) आले आहे. अमली पदार्थांच्या तस्करीतील पोलिसांचा सहभाग हा मोठा चिंतेचा विषय आहे. अमली पदार्थांची तस्करी वाढण्यामागे हेच महत्त्वाचे कारण आहे. याप्रमाणे प्रशासन आणि राजकारणी यांच्या हस्तक्षेपाविना अमली पदार्थांची तस्करी चालणे, हे अशक्य आहे. त्यामुळे कायदा कठोर करण्यासह अशा हस्तकांचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यातच युवा पिढीचे अर्थात् समाज आणि राष्ट्र यांचे हित आहे. यापूर्वी अमली पदार्थांचा प्रभाव मुंबईपुरता सीमित होता. सद्यःस्थितीत मात्र महाराष्ट्रातील सर्व प्रमुख शहरांतील कारवाया पहाता अमली पदार्थांचे जाळे अन्य शहरांमध्येही मोठ्या प्रमाणात पसरल्याचे दिसून येते. नागपूरमधील अमली पदार्थांच्या तस्करीचे कंबरडे मोडण्यासाठी गृह विभागाकडून 'ऑपरेशन थंडर' ही विशेष मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेमध्ये मागील ११ मासांमध्ये ९०७ कारवाया करण्यात आल्या. यावरून अन्य जिल्ह्यांमधील अमली पदार्थांच्या तस्करीचे जाळे लक्षात येते. हा सर्व प्रकार म्हणजे प्रशासन आणि पोलीस यांचा कुचकामीपणा आहे. याचे उदाहरण म्हणजे राज्यात गुटखाबंदी आहे. गुटख्याची विक्री रोखण्यासाठी या गुन्ह्यालाही सरकारने 'मकोका'च्या अंतर्गत आणले; परंतु त्यानंतरही गुटखा विक्री थांबलेली नाही. उलट बहुतांश टपऱ्यांवर गुटखा सर्रासपणे मिळतो. कारवाईपासून वाचण्यासाठी गुटखा उत्पादकांकडून तंबाखू आणि सुगंधी मसाला अशा वेगवेगळ्या वेष्टनांतून तो विकला जातो; परंतु यालाही अन्न आणि औषध प्रशासनाकडून प्रतिबंध आहे. असे असूनही ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये अशा प्रकारे गुटख्याची विक्री सर्रासपणे होणे, हेच प्रशासन अन् पोलीस यांचे अपयश आहे. गुटख्यावरील बंदी, म्हणजे 'गुटखा केवळ उघडपणे न विकणे', असे स्वरूप प्राप्त झाले आहे. अमली पदार्थांवरील बंदीचे स्वरूपही असे होऊ नये, यासाठी गांभीर्याने, कठोरपणे आणि प्रभावी कारवाई होणे आवश्यक आहे. अमली पदार्थांच्या तस्करीतील लहान मुलांचा सहभाग रोखण्यासाठी बालगुन्हेगारांचे वय १८ वरून १६ वर्षे करण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र सरकार केंद्र सरकारला पाठवणार आहे; परंतु कठोर कायद्याप्रमाणे पोलीस आणि प्रशासन यांतील त्यांचे हस्तक, तसेच भ्रष्टाचारी अधिकारी यांच्यावरही कठोर कारवाई व्हायला हवी. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे विद्यार्थीदशेपासूनच याविषयीची जागृती आवश्यक आहे. शिक्षणप्रणालीमध्ये अमली पदार्थांचे भयावह दुष्परिणाम सांगणे अत्यावश्यक झाले आहे. कठोर कायदा आणि प्रभावी कार्यवाही यांसह या उपाययोजना न केल्यास भविष्यात कारवायांचे आकडे वाढत जातील; मात्र समस्या अधिक गंभीर होईल. गुटखाबंदीप्रमाणे अमली पदार्थांच्या तस्करीचे केवळ कायदे कठोर आणि विक्री सर्रास असे होऊ नये एवढेच!

# ऊर्जाधोरण नेमके काय असावे, यावर विचार होणे गरजेचे



ते पहिल्या महायुद्धापूर्वीचे दिवस होते. ब्रिटिश साम्राज्यावरील सूर्य कधीही मावळत नसे. या ब्रिटिश वर्चस्वापुढे जर्मनीचे आव्हान उभे राहत होते. अशा काळात विन्स्टन चर्चिल नाविक मंत्री झाले. त्यांच्या लक्षात आले की भविष्यात जर्मनी आणि ब्रिटन यांच्यात संघर्ष होणार आणि त्यासाठी आपण ब्रिटिश नाविक सामर्थ्य वाढवायला हवे. नौदलाच्या आधारेच ब्रिटनचे जागतिक वर्चस्व टिकून होते. त्यासाठी ब्रिटनच्या युद्धनौका तेलावर चालतील असा निर्णय चर्चिल यांनी घेतला. त्याआधी ब्रिटिश युद्धनौका कोळशावर चालत असत. ब्रिटनमध्ये कोळसा मुबलक प्रमाणात सापडतो. त्यामुळे ब्रिटन कोळशाबाबत स्वयंपूर्ण होता. नाविक दलासाठी लागणारे तेल ब्रिटनमध्ये सापडत नसे. त्यामुळे तेल आयात करावे लागणार होते.

तेलासाठी ब्रिटनला इतर देशांवर अवलंबून राहावे लागणार हेही स्पष्ट होते. असे अवलंबित्व राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने धोकादायक असते. या परिस्थितीत ब्रिटनचे धोरण काय असायला हवे, असा प्रश्न समोर आल्यावर चर्चिल यांनी दिलेले उत्तर होतेः Safety and certainty in oil lie in variety and variety alone. कोणत्याही एका देशावर तेलासाठी अवलंबून राहणे हे धोकादायक असून आपल्याला आवश्यक असलेले तेल अनेक देशांकडून आयात करायला हवे, असा याचा अर्थ.

आज अमेरिका आणि इस्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्याच्या निमित्ताने आपल्यासमोर अतिशय गंभीर ऊर्जासंकट उभे आहे. स्वयंपाकासाठी लागणाऱ्या गॅसची टंचाई पाहता, १९७०च्या दिवसांची पुन्हा आठवण यायला सुरुवात झाली आहे. पश्चिम आशियातून दोन जहाजे आपल्या किनारपट्टीवर आली तर एखाद्या कोलंबसाला अमेरिका सापडावी अशा रीतीने आनंद व्यक्त केला गेला इतकी अवस्था गंभीर आहे. अशा परिस्थितीत, आपल्या देशाच्या ऊर्जासुरक्षेचा विचार करताना हेही लक्षात येईल की, भारतात अनेकांना न आवडणारे विन्स्टन चर्चिल पुन्हा खरे ठरले आहेत!

आज आपली अवस्था इतकी बिकट का झालेली आहे? या प्रश्नाचे उत्तर शोधताना आपल्या देशाच्या ऊर्जेची गरज कशी भागवली जाते, हे पाहायला हवे. तेल, गॅस आणि कोळसा हे आपल्याकडे ऊर्जेचे मुख्य स्रोत आहेत. याच बरोबरीने आता सौरऊर्जा आणि पवनऊर्जा यांचे प्रमाण हळूहळू वाढत आहे. ऊर्जा वापरात जागतिक स्तरावर भारत हा चीन आणि अमेरिका यांच्यानंतर तिसऱ्या क्रमांकाचा देश आहे. भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश आहे. तसेच देशाची वाढती अर्थव्यवस्था आणि मध्यमवर्गाचे वाढणारे प्रमाण यामुळे आपला ऊर्जेचा वापर इथून पुढच्या काळात वाढतच जाणार आहे. असा अंदाज व्यक्त केला जातो की, २०५० पर्यंत देशात पन्नास कोटी वाहने असतील.

आपल्याकडे केवळ मागच्या वर्षी दीड कोटी एसी विकले गेले. ही संख्या पुढे आणखी वेगाने वाढतच जाणार आहे. त्यामुळे भारताची ऊर्जेची गरज कशी भागवायची यावर विचारमंथन सुरू झाले आहे. ऊर्जा सुरक्षा हा प्रश्न विषमभुज त्रिकोणासारखा आहे.

या त्रिकोणाची एक बाजू ही जास्तीत जास्त लोकांना अधिकाधिक ऊर्जेचा पुरवठा परवडणाऱ्या किमतीत कसा करता येईल ही आहे. तर दुसरी बाजू ही ऊर्जा पुरवठा आणि आर्थिक विकास करतानाच पर्यावरण रक्षण कसे होईल, ही आहे. आणि याच्या जोडीला ऊर्जेचे आंतरराष्ट्रीय राजकारण ही तिसरी बाजू आहे. इराण युद्धाच्या निमित्ताने विषमभुज त्रिकोणाची ही तिसरी बाजू आता सर्वांत मोठी झालेली आहे.

भारताची तेलाची रोजची गरज ही पंचेचाळीस लाख बॅरल्स इतकी आहे. (एक बॅरल म्हणजे साधारणतः १५९ लिटर). यापैकी सुमारे पंच्याऐंशी टक्के तेल आयात केले जाते. तेलाचे देशांतर्गत उत्पादन गरजेच्या तुलनेत फारच कमी आहे. त्यामुळे तेल आयात करण्यावाचून भारताला पर्याय नाही. भारत कोणाकडून तेलाची आयात करतो? पश्चिम आशियातून सुमारे पंचेचाळीस टक्के तेल येते. एकेकाळी इराण हा आपला मोठा पुरवठादार होता. मात्र अमेरिकेच्या दबावाखाली भारताने इराणकडून तेल खरेदी बंद केली. रशिया सुमारे चाळीस टक्के तेलाचा पुरवठा करतो. उर्वरित पंधरा टक्के तेल हे अमेरिका, गयाना, नायजेरिया अशा देशांकडून येते. रशियाकडून तेलाची आयात ही २०२२ पासून फार मोठ्या प्रमाणावर सुरू झाली. हे तेल आपण खरेदी करू नये, यासाठी अमेरिकेने आपल्यावर दबाव टाकला होता. गॅसबाबत सुद्धा आयात करावीच लागते.

भारत जगातील सर्वांत मोठ्या गॅस आयातदारांपैकी एक आहे. आपल्या आयातीपैकी दोन तृतीयांश गॅस हा पश्चिम आशियातून येतो. कतार हा देश आपल्यासाठी या दृष्टीने महत्वाचा आहे. त्यामुळे तेल आणि गॅस या दोन्हीच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय राजकारण महत्त्वाचे ठरते.

या तेल आणि गॅसच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत एक मोठा फरक आहे. तेलाची बाजारपेठ ही जागतिक स्वरूपाची आहे. तेलाची वाहतूक ही प्रामुख्याने जहाजांमधून होते. गॅसबाबत असे नाही. गॅसची बाजारपेठ ही प्रादेशिक असते. गॅसचा पुरवठा हा मुख्यतः पाइपलाइन्स मधून होतो. (रशियाकडून युरोपला जाणाऱ्या गॅस पाइपलाइन्स युक्रेनमधून जातात.) गॅसची जहाजांमधून केली जाणारी निर्यात ही द्रवरूपात होते. त्यामुळे असा गॅस किनारपट्टीवर उत्तरावल्यानंतर या द्रवरूपाला पुन्हा वायुरूपात आणणे यासाठी खास 'री गॅसिफिकेशन' प्रकल्प लागतात. असे प्रकल्प नसतील तर गॅस भरलेली जहाजे येऊनही फार काही उपयोग होत नाही. त्यामुळेच गॅसचा पुरवठा हा दीर्घ मुदतीच्या करारांच्या माध्यमातून केला जातो. हे सांगण्याचा हेतू हा की, तेलाच्या बाजारपेठेत बऱ्यापैकी लवचीकता असते; तर गॅसच्या बाबत अशी लवचीकता खूप कमी असते. इथेच विन्स्टन चर्चिल यांचे विधान पुन्हा महत्त्वाचे ठरते.

या संकटाच्या निमित्ताने देशांतर्गत स्तरावर विजेवरील वाहनांचे महत्त्व पुन्हा एकदा नव्याने अधोरेखित झाले आहे. अनेकांनी स्वयंपाकासाठी इलेक्ट्रिक शेगड्या वापरायला सुरुवात केली आहे. त्या निमित्ताने वीजनिर्मिती क्षेत्राकडे पाहिल्यास काय चित्र दिसते? वीजनिर्मितीमध्ये नवीकरणीय (रीन्यूएबल) ऊर्जा क्षेत्राचे योगदान हे बावीस टक्के आहे.

देशातील पंच्याहत्तर टक्के वीजनिर्मिती ही कोळशाच्या माध्यमातून केली जाते. आपण दक्षिण आफ्रिका, इंडोनेशिया आणि ऑस्ट्रेलिया यांच्याकडून कोळशाची आयात करतो. वातावरण बदलाच्या दृष्टीने पाहिल्यास कोळशाला 'व्हिलन' मानले जाते. मात्र जर भारताने देशांतर्गत स्तरावर विजेवरील वाहने आणि शेगड्या यांचा मोठ्या प्रमाणात वापर सुरू केला तर त्यासाठी अधिकाधिक प्रमाणात वीजनिर्मिती करावी लागेल. त्यासाठी कोळशाला बाजूला टाकून चालणार नाही. त्यामुळे पर्यावरणपूरक विजेवरील वाहने चालवण्यासाठी कोळसा-निर्मित वीज वापरणे असा एक विरोधाभासी प्रकार आपल्याला पाहायला मिळतो. तसेच विजेवरील वाहनांच्या निर्मितीमध्ये चीनने मुसंडी मारलेली आहे. या वाहनांसाठी लिथियमच्या बॅटऱ्या लागतात. जगातील पंच्याहत्तर टक्के बॅटऱ्या चीनमध्ये तयार होतात. त्यामुळे विजेवरील वाहनांच्या दिशेने आपण गेलो आणि भविष्यात आपल्याला चीनने वेठीस धरले तर? त्यामुळे देशाच्या ऊर्जा सुरक्षेकडे पाहिल्यास काय दिसते? तेल आणि गॅस या क्षेत्रांमध्ये अमेरिका आघाडीवर आहे.

अमेरिकेशिवाय जगाचे पान हलू शकत नाही. तसेच अमेरिकेच्या कृतींमुळे या क्षेत्राचे अर्थकारण आणि राजकारण ठरते. अमेरिकी सत्ताधारी आणि तेल क्षेत्र यांचे घनिष्ठ संबंध जगजाहीर आहेत. आताही इराण युद्ध अमेरिकेनेच सुरू केले आहे. त्यामुळे तेल आणि गॅसकडे पाठ फिरवावी आणि विजेवरील वाहन क्षेत्राकडे जावे तर तिथे चीन उभा आहे. वीजनिर्मितीसाठी कोळसा वापरावा तर, हे इंधन वापरू नका, म्हणत जग अंगावर येते.

तसेच सौर ऊर्जा आणि पवन ऊर्जा याकडे जाणे असा पर्याय सुचवला जाऊ शकतो. मात्र या दोन्ही क्षेत्रांत आपल्या देशातील विशिष्ट उद्योगसमूह खूप आघाडीवर आहेत. अणुऊर्जा तयार करावी तर त्यासाठी पोषक असे वातावरण आपल्याकडे नाही. त्यामुळेच मनमोहन सिंग यांनी २००८ मध्ये अमेरिकेशी अणुकरार केल्यानंतरही आपल्या देशात अणुऊर्जा क्षेत्र भरारी घेऊ शकलेले नाही. कोकणातील जैतापूर अणुऊर्जा प्रकल्पाचे काय झाले हे आपण पाहिलेच आहे. अशा स्थितीत देशाला आवश्यक ती ऊर्जा कशी तयार करायची? कोणते स्रोत वापरायचे?

इथे पुन्हा विन्स्टन चर्चिल यांची आठवण काढायला हवी. त्यांनी सुचविले होते त्यानुसार 'variety and variety alone' हेच सूत्र संपूर्ण ऊर्जा क्षेत्राला लागू करता येईल. म्हणजे नेमके काय करणे? एक, तेल, गॅस, कोळसा, पवनऊर्जा, अणुऊर्जा, आणि सौर ऊर्जा या सगळ्या स्रोतांचा वापर ऊर्जानिर्मितीसाठी करणे. यापैकी एक स्रोत हवा आणि इतर नको असे करून चालणार नाही. यापैकी काही स्रोतांचे प्रमाण वाढवणे आणि काहींचे प्रमाण कमी करणे हेही व्हायला हवे. दोन, तेल, गॅस आणि कोळसा यांच्या पुरवठादारांमध्ये वैविध्य आणणे आवश्यक आहे. कोणत्याही एकाच देशावर अवलंबित्व नसावे. जर रशिया चाळीस टक्के तेल आणि कतार पन्नास टक्के गॅस पुरवत असेल तर त्यामुळे ऊर्जासुरक्षा वाढत नसून उलट ती धोक्यात येते. तीन, विजेवरील वाहने आणि सौर ऊर्जा या क्षेत्रांचे चीनवरील अवलंबित्व कमी करावे यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर नवीन भागीदार शोधणे आणि देशांतर्गत स्तरावर संशोधन व उद्योगनिर्मितीला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.

देशांतर्गत स्तरावर देखील विशिष्ट उद्योगांना झुकते माप देणे थांबवायला हवे. अशा स्वरूपाचे देशांतर्गत स्तरावरील अवलंबित्व देखील टाळायला हवे. चार, देशाच्या ऊर्जा व्यवस्थेमध्ये लवचीकता येईल, या दृष्टीने तयारी करायला हवी. देशांतर्गत साठे तयार करणे हा या धोरणाचा एक भाग झाला. त्याशिवाय जगभरातील संघर्षांचा आढावा घेऊन आपल्याला काय धोका निर्माण होऊ शकतो अशा स्वरूपाचे 'vulnerability mapping' करायला हवे. परराष्ट्र धोरणाचा वापर ऊर्जा सुरक्षेसाठी केला जात असतोच. मात्र परराष्ट्र धोरणात कोणत्याही एकाच बाजूला आपण झुकलेलो नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. नाही तर आता जसे इस्रायल आणि इराण यांच्याबाबत झाले तसे झाले की मग 'डॅमेज कंट्रोल' साठी खूप ताकद आणि वेळ खर्ची घालावा लागतो.




# युद्धामुळे गरीबांच्या भाकरीचे वांदे

एलपीजी गॅस सिलिंडरच्या तुटवड्यामुळे मुंबई, ठाण्यातील छोटे व्यावसायिक पुरते अडचणीत सापडले आहेत. ठाण्यातील घरगुती खाणावळी, पोळी भाजी केंद्रे बंद झाली आहेत. वडापाव आणि चहापोहे, शिरा विक्री करणाऱ्यांचेही किरकोळ व्यवसाय बंद पडले आहेत. मुंबई आणि ठाण्यातील सर्वच तालुका क्षेत्रातील सर्वसामान्य माणसांसाठी ही खाद्यपदार्थ विक्री केंद्रे आधार ठरत होती. ठाणे, कल्याण, डोंबिवलीहून पुढे अगदी कर्जत आणि कसाऱ्यापर्यंतचे स्थानिक रहिवाशांकडून अशी किरकोळ उपहारगृहे, खाद्यपदार्थ केंद्रे चालवली जात आहेत. ज्यातून त्यांना रोजगारही उपलब्ध होतो. ठाणे आणि बदलापूर किंवा डोंबिवली कल्याणातील कित्येक कुटुंबांचे मुख्य अर्थार्जनाचे साधन घरातील महिलांकडून चालवली जाणारी पोळी भाजी केंद्रे आहेत. अनेक घरातील मुलामुलींची शिक्षणं त्यांची लग्नं याच उत्पन्नावर होतात. पोळी भाजी केंद्रे चालवून महिलांनी पैसा मिळवून स्वतःची घरेही घेतली आहेत. ठाण्यातील ग्रामीण भागातील महिला रोजच्या रोज हजारो भाकऱ्या बनवून त्यांचे वितरण ठाणेसोबत मुंबईतील हॉटेल्समध्ये करतात. ठाणे, बदलापूर, उल्हासनगर, अंबरनाथ, टिटवाळा, कसारा या भागातील कित्येक भाकरी केंद्रांतून शेकडो महिलांना रोजगार उपलब्ध होतो. तांदूळ, ज्वारी, बाजरीची भाकरी थापून या भाकऱ्या ठाणे तालुक्यातील शहरांतील हॉटेल्समध्ये रोजच्या रोज पाठवल्या जात आहेत. सिलिंडर्सच्या दरवाढीमुळे या व्यवसायावरही मोठी गदा आली आहे.

ठाणे महापालिका क्षेत्रातील सामान्य नोकरदार वर्ग मुंबईकडे रोजगारासाठी रोजच्या रोज धाव घेतो. घरातील स्त्री आणि पुरुष दोघेही नोकरी करत असल्याने अशा कुटुंबासाठी पोळी भाजी केंद्राचा मोठा दिलासा आहे. सकाळच्या वेळेत केंद्रातून पाच चपात्या आणि भाजी डब्यात भरून स्वारी मुंबईकडे जाणारी लोकल पकडण्याठी स्टेशनला धाव घेत होती. आता सिलिंडर्सचा तुटवडा असल्याने जेवणासाठी वणवण करण्याची वेळ या नोकरदारांवर आली आहे. दुपारच्या वेळेत मुंबईसारख्या शहरांमध्ये काम करणाया खासगी आणि सरकारी कार्यालयांमध्ये पोळी भाजी सोबतच वरणभाताचे डबे पुरवण्याचे काम करणाऱ्या ठिकठिकाणच्या महिला किंवा गृहिणींचाही रोजगार धोक्यात आला आहे. कार्यालय परिसरात एखादे पोळी भाजी केंद्र असणे म्हणजे नोकरदारांसाठी मोठा दिलासा असतो, पण पोळी भाजी केंद्रच बंद झाल्याने कामाची ऊर्जा मिळवण्याचा मार्गच होर्मुजच्या सामुद्रधुनीसारखा बंद झाला आहे.

कुठल्याही सैन्याला विजय मिळवण्यासाठी अन्नाची रसद महत्वाची असते. सहा महिन्यांपूर्वी मुंबईत मराठा समुदायाचा मोठा मोर्चा धडकला होता. यावेळी लाखोंच्या संख्येने आंदोनकर्ते मुंबईत दाखल झाले होते. या हजारो आंदोलनकर्त्यांना मुंबईत भाजीभाकरी मिळवण्यात जाणीवपूर्वक अडचणी निर्माण केल्याचा आरोप झाला होता. त्यावेळी गावागावातून महिलांनी भाजीभाकरी आणि ठेचा भरलेल्या शिदोरीची रसद मुंबईतल्या आंदोनकर्त्यांना पुरवली होती. कुठल्याही युद्धात किंवा आंदोलनात लढणाऱ्या लढवय्या सैनिकांची खरी ऊर्जा त्यांच्या पोटात सामावलेली असते, 'भुखे भजन न होई गोपाला' किंवा 'आधी पोटोबा मग विठोबा' असे वाक्यप्रचार आपण ऐकलेले असतात, उपाशी कार्यकर्ता कधीच क्रांती करू शकत नाही, हे स्पष्ट असताना रोजच्या जगण्याच्या लढाईत उतरलेल्या सामान्य माणसांना गॅस सिलिंडरच्या तुटवड्यामुळे अर्धपोटी राहावे लागत आहे.

मध्य किंवा पश्चिम रेल्वेच्या सर्वच स्टेशन्सवर सकाळच्या वेळेत चहा पोहे, शिरा, उपमा, साबुदाण्याची खिचडी विकणाऱ्या महिला आढळतील. गॅस सिलिंडरच्या दरवाढी आणि कमालीच्या टंचाईमुळे त्यांच्या घरातील चूल पेटणेच कठीण झाले असताना इतरांच्या भुकेची काळजी वाहणाऱ्या पोळी भाजी किंवा भाकरी केंद्र चालवर्णाया अशा माताभगिनी कमालीच्या हतबल झाल्या आहेत. किरकोळ वडापाव, समोसे, भजी, उसळ, मिसळपाव विक्रेत्यांचीही परिस्थिती कठिण झाली आहे. पोळी भाजीतील पोळी गायब होऊन पाव आणि भाजी दिली जात आहे. मुंबई ठाण्यातील कित्येक छोट्या खाणावळी आणि हॉटेल्समधून चपात्या दिसेनाशा झाल्या आहेत. त्या जागी पावाच्या लाद्या देण्यात येतात. सिलिंडर्सच्या टंचाईमुळे इंडक्शन शेगड्यांची मागणी वाढली असताना ब्लॅकने अशा शेगड्यांची विक्री होत आहे. चहाच्या टपऱ्या, विविध ठिकाणच्या 'अमृततुल्य' चहा केंद्रांवर इंडक्शन शेगड्या आणि रॉकेलच्या स्टोव्हचा पर्याय शोधला जात आहे. परंतु रॉकेलही दुर्मिळ झाल्याने चहाही महाग झाला आहे.

चिकन, मटण, तयार मासळी विक्री करणाया आणि त्यावर अवलंबून असलेल्या सामान्य खव्वय्यांची पंचाईत होत आहे. मराठी, मालवणी पद्धतीच्या मांसाहारी जेवणावळीतील १०० रुपयांची थाळी १५० रुपयांवर थेट गेली आहे. तर अनेक ठिकाणी तुटवड्यामुळे व्यावसायिक गॅस सिलिंडर खरेदी करण्यासाठी दोन ते अडीच हजार रुपये ब्लॅकने द्यावे लागतात, अशी खंत खाणावळी चालवणारे व्यक्त करत आहेत. कित्येक वर्षांपासून आमच्या खाणावळीवर अवलंबून असलेल्यांना आम्ही उपाशी ठेवू शकत नाही, असे बोलून पदरमोड करत खिशाची झळ सोसून माताभगिनी इतरांसाठी कशीबशी चुलीची धग कायम ठेवत आहेत. ही चूल थंडगार पडता कामा नये, यासाठी वेळीच पर्यायी व्यवस्था करण्याची गरज आहे. महागड्या किंवा पंचतारांकीत हॉटेलमधल्या जेवणाच्या स्वप्नापेक्षा पोळी भाजी केंद्रातील सुविधा सामान्य माणसांसाठी दिलासा देणारे वास्तव असते. सिलिंडर दरवाढ आणि एलपीजी टंचाईमुळे सामान्यांची ही भाकरीच अडचणीत आली आहे. रिकाम्या पोटाने युद्ध जिंकता येत नाहीत हे खरेच, मात्र दबलेली भूक जास्त हिंसक आणि हानीकारक ठरू शकते, हेही खरेच...

## विधानसभांचे घमासान



एप्रिल महिन्यात देशातील पाच राज्यांमध्ये विधानसभा निवडणुकांचे बिगुल वाजले आहे. पश्चिम बंगाल, आसाम, केरळ आणि तमिळनाडू तसेच पुदुच्चेरी या ठिकाणी ९ ते २९ एप्रिल दरम्यान मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. ४ मे रोजी या निवडणुकांचे निकाल जाहीर होतील. या निवडणुकांमध्ये सत्ताधारी भाजप, काँग्रेस आणि इतर प्रादेशिक पक्षांचे भवितव्य ठरणार आहे. आसाम आणि पुदुच्चेरी वगळता इतर तीन राज्यांमध्ये भाजपची सत्ता नाही, त्यामुळे या राज्यांमध्ये आपला प्रभाव वाढवणे हे भाजपचे मुख्य उद्दिष्ट आहे. पश्चिम बंगालमध्ये भाजप तृणमूल काँग्रेसला जोरदार टक्कर देत आहे, तर तृणमूल काँग्रेसही त्यांना चोख प्रत्युत्तर देत आहे. केरळ, तमिळनाडू आणि पश्चिम बंगालमध्ये सध्या सत्तेवर असलेल्या प्रादेशिक पक्षांचा प्रभाव कायम राहणार की राष्ट्रीय पक्षांना पुन्हा यश मिळणार, हे देशाच्या राजकारणाची दिशा ठरवण्यासाठी महत्त्वाचे ठरेल. पश्चिम बंगालमधील निवडणुकांकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे. मतदार यादीच्या पडताळणीवरून सुरू झालेला वाद आणि राष्ट्रपतींच्या दौऱ्यावरून झालेले आरोप-प्रत्यारोप यामुळे हे राज्य राजकीय चर्चेचे केंद्र बनले आहे. गेल्या काही निवडणुकांमध्ये पश्चिम बंगालमध्ये भाजपचा लोकसभेतील आलेख उंचावला असला तरी विधानसभेत त्यांना यश मिळालेले नाही. सलग १५ वर्षे सत्ता टिकवून असलेल्या ममता बॅनर्जी यंदाही बंगाली अस्मितेचा मुद्दा पुढे करत आहेत. काँग्रेस आणि डावे पक्ष सध्या बंगालमध्ये फारसे प्रभावी नाहीत. मात्र, हेच पक्ष केरळमध्ये एकमेकांविरुद्ध लढताना दिसत आहेत. केरळमध्ये दर निवडणुकीत सत्ता बदलण्याची परंपरा गेल्या निवडणुकीत खंडित झाली होती. त्यावेळी डाव्या आघाडीने सलग दुसऱ्यांदा सत्ता मिळवली होती. मात्र, त्यानंतरच्या काळात परिस्थिती बदलली आहे. नुकत्याच झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये काँग्रेसप्रणित 'UDF' आघाडीने मोठे यश मिळवले आहे. त्यामुळे विधानसभेच्या निवडणुकीतही त्यांच्या आशा वाढल्या आहेत. तिरुअनंतपुरम महापालिकेत सत्ता मिळवणाऱ्या भाजपचे लक्ष मतांची टक्केवारी वाढवण्यावर आणि काही जागा जिंकण्यावर असेल. आसामचे राजकारण सध्या ध्रुवीकरणाच्या दिशेने झुकलेले दिसत आहे. मुख्यमंत्री हेमंता बिश्व सरमा 'हिंदू-मुस्लिम' वादाला खतपाणी घालत असल्याचे दिसून येते. दुसरीकडे, काँग्रेसने गौरव गोगोई यांच्यासाठी प्रियंका गांधी यांच्यावर उमेदवार निवडीची जबाबदारी सोपवून निवडणूक प्रतिष्ठेची केली आहे. तमिळनाडूमध्ये काँग्रेस आणि भाजप हे दोन्ही राष्ट्रीय पक्ष अनुक्रमे द्रविड मुन्नेत्र कळघम आणि अण्णा द्रविड मुन्नेत्र कळघम यांच्या पाठिंब्यावर आपले राजकारण करत आहेत. यंदाही हेच चित्र कायम असले तरी अभिनेता थलपती विजय आणि नव्याने राजकारणात आलेल्या शशिकला यांच्यामुळे मतांमध्ये किती फरक पडतो, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. एकंदरीत, भाजपसाठी आसामची सत्ता टिकवणे आणि पश्चिम बंगालमध्ये पर्याय निर्माण करणे हे महत्त्वाचे आहे. तर काँग्रेससाठी केरळमध्ये सत्ता मिळवणे आणि आसाममध्ये आव्हान उभे करणे हे ध्येय आहे. केरळ गमावल्यास डाव्या आघाडीला देशातून इतिहासजमा होण्याची भीती आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीत पिछेहाट झाल्यामुळे भाजप केंद्रातील स्पष्ट बहुमतापासून दूर राहिला होता. मात्र, त्यानंतर त्यांनी महाराष्ट्र, हरियाणा, बिहार आणि दिल्लीमध्ये पुन्हा मुसंडी मारली. आता केरळ आणि आसाममध्ये चांगली कामगिरी केल्यास विरोधकांच्या आशा पुन्हा वाढतील. तृणमूल काँग्रेस, द्रमुक आणि अण्णा द्रमुक यांसारख्या प्रादेशिक पक्षांचे लक्ष आपापल्या राज्यांमध्ये आपले स्थान टिकवून ठेवण्यावर आहे.

# बो-टाय पास्ता सॅलड

**साहित्य :** १ वाटी बो-टाय पास्ता (टायचा बो अर्थात गाठीप्रमाणे आकार असलेला पास्ता), १०० ग्रॅम बोनलेस चिकन, ३ ब्रेड स्लाइस, ४-५ लसूण पाकळ्या, ५० ग्रॅम ऑलिव्ह तेल, १०० ग्रॅम प्रोसेस्ड चीझ, २ अंड्यांचे पिवळे बलक, मीठ चवीनुसार, ८-१० लेट्युसची पाने, हवे असल्यास चिली फ्लेक्स.



**कृती :** सगळ्यात आधी पास्ता मिठाच्या उकळत्या पाण्यातून उकडून घ्या. बो-टाय पास्ता मिळाला नाही किंवा आवडत नसेल तर मॅक्रोनी किंवा तुमच्या आवडीचा पास्ता घेता येईल. पास्ता उकडल्यावर लगेचच पाण्याखाली गार करा आणि थोडं तेल लावून फ्रीजमध्ये ठेवा. लसणीचे बारीक बारीक तुकडे करून घ्या. चिकनला मीठ, मिरपूड लावून पॅनमध्ये थोड्याशा ऑलिव्ह तेलात शिजवून घ्या. ब्रेड स्लाइसचे छोटे छोटे चौकोनी तुकडे करून ते पॅनमध्ये भाजून घ्या. यात थोडंसं तेल आणि लसूण घालून त्याला छान लसणीचा स्वाद येऊ द्या. चीझ किसून ठेवा. अंड्याचे पिवळे बलक चांगले लुसलुशीत होईपर्यंत फेटून घ्या. त्यात चीझ घाला आणि थोडंसं ऑलिव्ह तेल घाला. मिश्रण फेटून घ्या. एका बाऊलमध्ये लेट्युसची पाने, पास्ता, चिकन आणि ब्रेडचे तुकडे एकत्र टॉस करा. त्यावर बनवलेले चीझ आणि अंड्याचे ड्रेसिंग वाढा. आता हे सॅलड थंड करून पेश करा.

# फेस स्क्रब डोळ्यांच्या पापण्यांवर वापरणे योग्य आहे का?

**जर तुम्ही वारंवार मेकअप करीत असाल तर शक्य असेल तेव्हा मेकअप करणे टाळा. प्रत्येकवेळी मेकअप केल्यावर तो एखाद्या चांगल्या क्लिनझरने काढून टाका. ब्युटी एक्स्पर्ट आश्मीन मुंजल यांच्याकडून जाणून घेऊयात डोळ्यांच्या पापण्यांची निगा कशी राखावी.**

**संपूर्ण** चेहऱ्यात डोळे हा फार नाजूक अवयव आहे. त्यात डोळ्यांच्या पापण्या हा तर अति संवेदनशील भाग आहे. त्यामुळे निरोगी राहण्यासाठी व सौंदर्य टिकवण्यासाठी त्यांची डोळ्यांची योग्य निगा राखणे फार गरजेचे आहे.

जर तुम्ही वारंवार मेकअप करीत असाल तर शक्य असेल तेव्हा मेकअप करणे टाळा. प्रत्येक वेळी मेकअप केल्यावर तो एखाद्या चांगल्या क्लिनझरने काढून टाका. ब्युटी एक्स्पर्ट आश्मीन मुंजल यांच्याकडून जाणून घेऊयात डोळ्यांच्या पापण्यांची निगा कशी राखावी.



सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे डोळ्यांच्या पापण्यांवर कधीही स्क्रब वापरू नका. कारण तुमच्या पापण्यांवरील अतिसंवेदनशील त्वचा व पापण्यांवरील केस यावर अति सौंदर्यप्रसाधनांचा वापर केल्यामुळे त्यांचे नुकसान होऊ शकते. खरं तर पापण्यांना फार स्वच्छतेची गरज नसते व पापण्यांवर फेस स्क्रब तर मुळीच वापरू नयेत.



तसेच चेहऱ्यासाठी वापरण्यात येणारे फेस स्क्रब डोळ्यांच्या पापण्यांसाठी योग्य नसतात. कारण ते पापण्यांच्या त्वचेसाठी त्रासदायक ठरू शकतात. मात्र जर तुमच्या भुवयांच्या केसांमध्ये कोंडा असणे किंवा तुम्हाला पापण्यांजवळील त्वचा कोरडी असण्याची समस्या असेल तर तुम्ही अगदी सौम्य स्क्रब वापरू शकता. यासाठी अति दाणेदार अथवा खरखरीत नसलेले एखादे सौम्य ॲप्रिकॉट स्क्रब तुम्ही घेऊ शकता. या स्क्रबचा काही भाग घ्या व त्यामध्ये थोडे मॉश्चरायझर मिसळून तुम्ही त्याचा हलक्या हाताने तुमच्या पापण्यांवर मसाज करू शकता. हा मसाज करताना एक गोष्ट नेहमी लक्षात ठेवा हा मसाज क्लॉकवाइज करावा.

जर तुमच्या पापण्यांवरील केस पातळ व कमजोर असतील तर मात्र तुमच्या डोळ्यांच्या आजूबाजूला कोणतेही सौंदर्यप्रसाधने वापरू नका. जर तुमच्या पापण्यांवरील केस दाट असतील व तुम्हाला कोरड्या त्वचेची समस्या असेल तर तुम्ही वर दिलेले मिश्रण वापरू शकता. डोळ्यांच्या पापण्यांवर कोरफडाचे जेल अथवा मास्क वापरणे योग्य ठरेल.

# सकाळची न्याहारी किती आवश्यक आहे!

**सकाळची** न्याहारी शरीरासाठी किती आवश्यक आहे, हे सर्वजण जाणत असूनही अनेक लोक सकाळच्या नाश्त्याकडे दुर्लक्ष करून घराबाहेर पडतात. त्याचे दुष्परिणाम मग त्यांच्या शरीरावर होतात.

सकाळचा नाश्ता निरोगी राहण्यासाठी फार महत्त्वाचा आहे. नाश्ता शरीरात ऊर्जा निर्माण करतो. नाश्ता करणारे लोक नाश्ता न करणाऱ्या लोकांपेक्षा अधिक धडधाकट असतात. सकाळी उठल्यानंतर एक तासात नाश्ता करायला हवा. नाश्ता केल्याने मेंदूला चालना मिळते व एकाग्रता वाढायलाही मदत होते. शाळा-कॉलेजांत जाणारी बरीचशी मुले जी नाश्ता करत नाही, त्यांचे लक्ष अभ्यासात केंद्रित होत नाही. पण समतोल नाश्ता घेतला तर अनेक आजारांपासून आपला बचाव होऊ शकतो.



सकाळच्या नाश्त्यात प्रथिने, खनिज, व्हिटॅमिन, फायबर, कार्बोहायड्रेट इत्यादी घटकांचा समावेश करा. नाश्त्यामध्ये भाज्या, फळं, दूध, मोड आलेले कडधान्य, पनीर, दही, सालीच्या डाळी इत्यादींचा समावेश करा. तसेच संमिश्र भाज्या मिळवलेले पोहे, ओट्स, उपमा, दालिया, चिलाल चपाती, इडली, उकडलेले अंडे इत्यादी घेऊ शकता.

सकाळचा नाश्ता केल्यास हृदयरोग, अल्सर, मधुमेह, लठ्ठपणा यासारख्या आजारापासून बचाव होऊ शकतो.

# आपल्याला होते फूड ॲलर्जी, तर हे करा

**जेव्हाही** आपले शरीर खाण्याप्रती अधिक क्रियाशील होते तेव्हा फूड ॲलर्जीची तक्रार होऊ शकते. अशात काही प्रोटीनयुक्त आहारदेखील आपल्या शरीराला नुकसान करू शकतात कारण काही लोकांची प्रतिकारशक्ती काही पदार्थांना प्रतिसाद देऊ शकत नाही आणि त्याचे दुष्परिणाम म्हणून ॲलर्जी दिसून येते. मुख्यतः लोकांना मैदा, सोया, अंडी, मासे, शेंगदाणे, काही विशिष्ट मसाले किंवा एखाद्या तेलाच्या प्रकारची ॲलर्जी असते. कधी कधी ॲलर्जी टेस्ट मध्येही ॲलर्जी नेमकी कसली आहे हे कळून येत नाही. अशात ते आपल्यालाच शोधून काढायला हवे. एकदा ॲलर्जी कोणत्या पदार्थाची आहे समजल्यावर पथ्ये पाळणे आवश्यक असतं.

**सामान्यतः ॲलर्जीची ही लक्षणे असतात**

- खाज सुटणे
- अतिसार
- डोळे, ओठ आणि चेहऱ्यावर सूज येणे
- श्वास घ्यायला त्रास होणे
- हृदयाच्या ठोक्यांची गती वाढणे

**यापासून वाचण्यासाठी**

- जर आपल्या खाण्यामुळे त्रास होत असेल तर खाण्याशी संबंधित सर्व धान्य टाळावे.
- बाहेर आहार घेताना विशेष काळजी घ्यावी.

# लंचनंतर अजिबात नका करू हे काम

**ब्रश करणे :** लंचनंतर ब्रश करणे योग्य नाही. कारण आपण सिट्रस असलेला आहार घेतला असल्यास ब्रश केल्याने दातांवरील ती परत निघून जाते ज्याला इनेमल असे म्हणतात.



**अधिक पाणी पिणे :** आपण जेवल्यानंतर अधिक मात्रेत पाणी पित असल्यास पाचक प्रणालीवर याचा गंभीर प्रभाव होतो. यामुळे अनेक रोग उद्‌भवण्याची शक्यता असते. खरं म्हणजे जेवताना आणि जेवण झाल्यावर लगेच पाणी पिणे विष समजले जाते. जेवण झाल्यावर कमीत कमी अर्धा किंवा तासाभरानंतर पाणी पिणे योग्य आहे.

**फिरणे :** काय आपण ही लंच घेतल्यानंतर फेऱ्या मारता? पण ही एक हानीकारक सवय आहे जी लगेच थांबवायला हवी. तज्ज्ञांप्रमाणे आमची पाचक प्रणाली इतकी मजबूत आहे की लंचमध्ये आपण कितीही अटरम- शटरम खाल्लं असेल तरी सर्वकाही पचून जातं. या दरम्यान आमची प्रणाली आहाराला पचवून सर्व आवश्यक पोषण आम्हाला ऊर्जेच्या रूपात देतं. पण आमचे हे सिस्टम जरा संवेदनशील असल्यामुळे तेव्हा त्याला आपले कार्य सुरळीतरीत्या पार पडण्यात अडथळा निर्माण होतो जेव्हा आपण त्याला यातना देतात. म्हणून दुपारी लंच केल्यानंतर फिरणे किंवा काही हेवी कार्य करण्याऐवजी १५ ते २० मिनिटे आराम करण्याचा सल्ला दिला जातो.

**ड्रायव्हिंग :** जेवण पचवण्यासाठी अधिक रक्ताची गरज असते, ज्यासाठी मेंदू मदत करतं. परंतु जेवल्यानंतर आपण ड्रायव्हिंग करत असाल तर मेंदू त्यावर आपलं लक्ष केंद्रित करतो आणि जेवण पचवण्यात त्याची मदत मिळत नाही.

**झोपणे :** लंचनंतर लगेच झोपल्याने पचन संबंधी रोग होऊ शकतात. याने आपल्या गॅससंबंधी समस्याही उद्‌भवू शकते.

# फोनचे ब्लूटूथ नेहमी ऑन असते?

## मिनिटात होऊ शकते डिव्हाइस हॅक, असे राहा सेफ

जर तुम्ही तुमच्या फोनमध्ये नेहमी ब्लूटूथ चालू ठेवत असाल तर, सावध व्हा. कारण, यामुळे तुमचा फोन हॅक देखील होऊ शकतो. जाणून घेऊया याबद्दल सविस्तर. ब्लूटूथ सर्व फोनमध्ये असते आणि बरेच लोक ते सतत वापरतात सुद्धा. स्मार्टफोन, टॅबलेट आणि लॅपटॉपमध्ये ब्लूटूथ आधीच दिलेले आहे. एका डिव्हाइसवरून दुसऱ्या डिव्हाइसमध्ये फाइल ट्रान्सफर करण्यासाठी ब्लूटूथची आवश्यकता असते. पण तुम्हाला माहीत आहे का ? डिव्हाइसमध्ये असलेले ब्लूटूथ जितके सोयीस्कर आहे तितकेच ते धोकादायकसुद्धा असू शकते. हॅकर्स ब्लूटूथद्वारे तुमचे डिव्हाइस हॅक करू शकतात. त्याला ब्लूबगिंग असेही म्हणतात. ब्लूटूथ हॅकिंग कसे केले जाते आणि त्यापासून तुम्ही कसे सुरक्षित राहू शकता, याबद्दल ही महत्त्वाची माहिती.

**ब्लूटूथ हॅकिंग कसे काम करते?**

हॅकर्स एक विशिष्ट सॉफ्टवेअर वापरतात, जे आपोआप ब्लूटूथने सुसज्ज असलेली उपकरणे शोधतात. हॅकर्स हेदेखील पाहू शकतात की, तुमचे डिव्हाइस आधी कोणत्या नेटवर्कशी कनेक्ट केले गेले आहे. फोन आधीपासून कनेक्ट केलेले नेटवर्क पुरेसे विश्वासार्ह मानतो आणि भविष्यात त्यांच्याशी आपोआप कनेक्ट होतो. सायबर गुन्हेगारांना तुमच्या डिव्हाइसचे विश्वसनीय नेटवर्क माहीत असल्यास, ते त्याद्वारे तुमच्या डिव्हाइसशी कनेक्ट होतात. यानंतर तुमचे डिव्हाइस हॅक होते. त्यानंतर हॅकर्स डिव्हाइसमध्ये मालवेअर इन्स्टॉल करतात. याद्वारे हॅकर्स तुमची हेरगिरी करतात. तुमचे मेसेजेस वाचतात आणि डेटा देखील चोरू शकतात.



**यापासून सुरक्षित कसे राहायचे?**

डिव्हाइस वापरात नसताना ब्लूटूथ डिसेबल करा. तुम्हाला फाइल्स ट्रान्सफर करायच्या असतील तर, तुम्ही एयर ड्रॉप किंवा फास्ट शेयर वापरू शकता. ब्लूटूथ सेवांची प्रवेशक्षमता मर्यादित करा. हे ब्लूबगिंग टाळते. तुमच्या स्मार्टफोन, टॅबलेट आणि ब्लूटूथ सक्षम संगणकांवर तुमच्याकडे अँटीमालवेअर ॲप स्थापित असल्याची खात्री करा. एखाद्या हॅकरने तुमच्या डिव्हाइसमध्ये शिरण्याचा प्रयत्न केल्यास, अँटी-मालवेअर ॲप तुमची गोपनीयता आणि वैयक्तिक डेटा संरक्षित करताना संशयास्पद ॲक्टीव्हीटीज शोधू आणि ब्लॉक करू शकतो.

# अंडे तुमचे रक्षण करेल मधुमेह होण्यापासून

**आजच्या** घडीला कमी वयातच कित्येक लोकांना मधुमेह म्हणजे डायबेटिसचा त्रास होऊ लागला आहे. पण तुम्हाला जर अंडे खायला आवडत असेल तर तुमच्यासाठी एक आनंदाची बातमी आहे. तसे तर अंडे नेहमी खाल्ल्याने अनेक फायदे होतात. पण 'अमेरिकन जर्नल ऑफ क्लिनिकल न्यूट्रिशन'मध्ये नुकत्याच प्रकाशित झालेल्या एका अभ्यासात असे समोर आले आहे की, एका आठवड्यात चार अंडी पुरुषांनी खाल्ली तर त्यांना टाइप-२ मधुमेह होण्याची शक्यता आठवड्यातून एकच अंड खाणाऱ्या पुरुषापेक्षा ३७ टक्क्यांनी कमी होते. जगभरात टाइप-२ मधुमेह चांगला वेगाने पसरत असून वर्ष १९८४ ते १९८९ च्या मधील ४२ ते ६० वयोगटातील २,३३२ वयोवृद्ध लोकांच्या खाण्या-पिण्याच्य सवयींचे पूर्व फिनलंड विश्वविद्यालयातील संशोधकांनी मूल्यांकन केले. त्यानंतर १९ वर्षे त्यांचा फॉलोअप घेतल्यानंतर ४३२ लोकांना टाइप-२ मधुमेह झाल्याचे आढळले. अभ्यासातून समोर आले की, अंड्याचे सेवन केल्याने टाइप-२ मधुमेह होण्याची शक्यता आणि रक्तात ग्लुकोज स्तर कमी झाला.



# किचनमधील हे पदार्थ केवळ स्वाद नाही तर त्वचेची चमकदेखील वाढवतात

## हरभरा पीठ आणि हळदीचा फेस पॅक

**साहित्य :**

- अर्धा किंवा एक चमचा हळद
- चार चमचे हरभरा पीठ
- दूध किंवा पाणी



**वापरण्याची पद्धत :**

- हरभरा पीठ आणि हळदीची पेस्ट बनवण्यासाठी पाणी किंवा दुधाचा वापर करा.
- ही पेस्ट चेहरा, मानेवर लावा आणि वाळू द्या. नंतर पाण्याने धुऊन घ्या.
- ही पेस्ट आठवड्यातून १ किंवा २ वेळा वापरली जाऊ शकते.

**हे कसे कार्य करते?**

हळदीत करक्युमिन नावाचे अँटीऑक्सिडेंट आढळतात आणि त्यात अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म असतात. हे त्वचेतील हानीकारक पदार्थ काढून आणि कोलेजनचे उत्पादन वाढवून त्वचेस तेजाळ करते.

## टोमॅटो आणि चंदन पावडरचा फेस पॅक

**पॅकसाहित्य :**

अर्धा टोमॅटो, एक चमचा चंदन पावडर, चिमूटभर हळद

**वापरण्याची पद्धत**

- टोमॅटोमधील बिया काढाव्या.
- बिया नसलेल्या टोमॅटोत चंदनाची पावडर आणि हळद मिसळून त्याची पेस्ट करावी.
- ही पेस्ट चेहऱ्यावर लावून पंधरा मिनिटे तशीच राहू द्यावी. नंतर चेहरा पाण्याने स्वच्छ धुवावा.
- आठवड्यातून १ किंवा २ वेळा हा उपाय करता येऊ शकतो.





**हे कसे कार्य करते?**

टोमॅटोमध्ये व्हिटॅमिन सी जास्त प्रमाणात असते, त्यामुळे चेहरा सतेज होतो.

# साखरेमुळे होणारे नुकसान

**साखर मानव जीवनातील अविभाज्य अंग आहे आणि तिचा गोडवा जितका हवा हवासा वाटतो तेवढेच ते नुकसानदायकही आहे. जर आपल्यालाही साखर खाण्याची सवय असेल तर यापासून होणारे पाच नुकसान जाणून घ्या :**



**मधुमेह :** आपल्या परिवारात कोणालाही डायबेटिस असल्यास आपण साखर कमी करावी. कारण अनुवांशिक रूपात याचे सेवन मधुमेहाचे कारण बनू शकतं.

**खाज :** साखरेची अतिरिक्त मात्रा सेवन केल्याने गुप्तांगामध्ये खाज सुटण्याची तक्रार होते. याने गुप्तांगाहून अत्यधिक तरल स्राव आणि संक्रमण होण्याची शक्यताही असते.

**हृदयरोग :** अधिक साखरेमुळे हृदयनलिकेत चरबी जमा होऊन ती ब्लॉक होण्याची शक्यता असते. याने हार्ट ॲटॅकची शक्यता वाढते.

**इसब :** त्वचेवर अधिक साखर सेवन केल्याचे वाईट परिणाम भोगावे लागतात. एका संशोधनाप्रमाणे साखरेमुळे इसब होण्याची शक्यता वाढते.

**कमजोर हाडे :** साखरेमुळे हाडे कमजोर होतात आणि ऑस्टिओपोरोसिस रोग होण्याची शक्यता असते.

# वजन कमी करायचे आहे? मग काकडीचे सेवन करा!

**काकडीत खूप कमी प्रमाणात कॅलरी असतात. १०० ग्रॅम काकडीमध्ये ५४ कॅलरी ऊर्जा असते. म्हणूनच काकडी खाल्ल्यानं वजन वाढत नाही. काकडी ब्लड प्रेशर कमी करते, मात्र ब्लड प्रेशरचा त्रास असणाऱ्या रुग्णांनी काकडीला मीठ लावून खाऊ नये. काकडी शरीरातील विषारी पदार्थ युरिनच्या माध्यमातून शरीराबाहेर काढते.**

- सोबतच काकडीच्या ज्यूसमध्ये अशी काही पोषक तत्त्वे आहेत की ज्यामुळं बद्धकोष्ठता आणि ॲसिडिटीची समस्या दूर होऊ शकते.
- पचनक्रिया मजबूत करण्यासोबत काकडी गॅस्ट्रिक आणि छोट्या आतडीचा अल्सर झालेल्या रुग्णांसाठी औषध म्हणून काम करते.
- काकडीमध्ये ९६ टक्के पाणी असतं, जे की कोणत्याही कंपनीच्या बंद बाटलीच्या पाण्यापेक्षा चांगलं आणि शुद्ध असतं.
- काकडीमध्ये अल्कलिन फॉर्मिंग (क्षार) मिनरल्स असतात, म्हणूनच त्याचा वापर ब्युटी प्रॉडक्ट्समध्येही प्रयोग केला जातो. यात अँटीऑक्सिडंटचं काम करणारे व्हिटॅमिन ए, सी, मॅंगनिज, पोटॅशियम, सिलिका आणि सल्फर असते.
- ताप आल्यास काकडीचा ज्यूस प्यावा. त्यामुळे शरीराचं तापमान नियंत्रणात राहतं.
- जर अपचनाचा त्रास होत असेल तर जेवणासोबत सॅलड म्हणून काकडी खावी.
- काकडी गोल कापून डोळ्यावर ठेवल्यास डोळ्यांची जळजळ कमी होते. दररोज सॅलड म्हणून काळं मीठ, काळीमिरी आणि लिंबू पिळून काकडी खावी. काकडीची कोशिंबिरही बनवून आपण खाऊ शकता.





# तांदळाचे हे आहेत अनेक फायदे



**चेहऱ्यावरील डाग दूर होतात :** चेहऱ्यावरील डाग घालवण्यासाठी उपयोगी आहे तांदूळ. तांदूळ बारीक वाटून घ्या. वाटलेल्या तांदळाच्या पिठामध्ये थोडेसे पाणी मिसळून ही पेस्ट चेहऱ्यावर हलक्या हाताने लावा. यामुळे चेहऱ्यावरील डाग दूर होतात.

**डोकेदुखीसाठी फायदेशीर :** डोकेदुखीचा त्रास होत असल्यास शिजलेल्या भाताच्या पाण्यात एक चिमूट स- ुंठ पावडर मिसळून डोक्यावर लावा. यामुळे डोकेदुखीपासून सुटका होते.

**जुलाबाचा त्रास होतो दूर :** जुलाबाचा त्रास होत असल्यास तांदूळ बारीक वाटून घेऊन ते पाण्यात उकळवा. यात मीठ टाकून ही पेज प्या. यामुळे जुलाबाचा त्रास कमी होतो.

**सतत तहान लागणे :** सतत तहान लागत असेल तर तांदळाचे दाणे दिवसातून दोन-तीन वेळा चावून चावून खा. यामुळे तहान लागणे कमी होते.





**आयुर्वेदानुसार मनुकांमध्ये भरपूर मात्रेत औषधी गुण असतात. आम्हाला रोज ४-५ मनुका खायलाच पाहिजे. मनुकांना सर्दी-खोकला आणि कफ दूर करण्याचे सर्वात उत्तम औषध मानले जाते. त्याशिवाय देखील मनुकांचे बरेच फायदे असतात. त्यात उपस्थित न्यूट्रएंट्स बऱ्याच आजारांमध्ये फायदेशीर ठरतात. तर जाणून घेऊ रोज मनुका खाण्याचे काय फायदे आहेत...**

# रोज करा ५ मनुकांचे सेवन आणि बघा त्याचे फायदे

- मनुका खाल्ल्याने ब्लड सर्क्युलेशन इम्प्रुव्ह होते. यामुळे त्वचेची रंगत वाढते आणि रंग देखील निखरण्यास मदत होते.
- मनुकांमध्ये फायबर्स असतात. हे डायजेशन योग्य ठेवण्यास मदत करतात.
- यात पोटॅशियमची मात्रा जास्त असते. मनुका हार्ट ॲटॅकच्या आजारांमध्ये इफेक्टिव्ह आहे.
- यात आयर्न असतं. हे ॲनिमिया (रक्ताची कमतरता) दूर करण्यास फायदेशीर ठरतात.
- यात अँटीऑक्सिडेंट्स असतात. यामुळे कॅन्सरसारख्या गंभीर आजारांपासून बचाव होण्यास मदत मिळते.
- यात अँटीबॅक्टेरियल गुण असतात. यामुळे सर्दी-खोकला ठीक होण्यास मदत मिळते.
- यात बीटा कॅरोटिन असते, जे डोळ्यांसाठी फायदेशीर ठरतं.
- यात ऑक्झेलिक ॲसिड असतं. यामुळे दात मजबूत होतात. यामुळे गम प्रॉब्लेमपासून बचाव होतो.
- यात कॅल्शियमची मात्रा अधिक असते. म्हणून जॉइंट पेनपासून बचाव होतो.
- याचे सेवन केल्याने बॉडीचे टॉक्सिन्स दूर होऊन हेअर फॉलची समस्या देखील दूर होते.

**मनुका खाण्याचे हेल्दी मार्ग**

- कब्ज दूर करण्यासाठी रात्री पाच मनुका आणि एक लसणाची कळी खायला पाहिजे.
- मनुकांत मध मिसळून खाल्ल्याने देखील फायदा होतो.
- याला दुधात उकळून त्याचे सेवने केल्याने देखील फायदा होतो.
- मनुकांमध्ये बडिशेप आणि ओवा मिसळून खाल्ल्याने देखील फायदा होतो.

# बोईसर-तारापूर एमआयडीसीमध्ये पुन्हा वायू गळती

## रासायनिक वायूमुळे दुर्घटनेत 15 ते 18 कामगार बाधित

■ **बातमी /लेख,**
**प्रीती दिपक नाईक**

तारापूर औद्योगिक क्षेत्रातील आरती फार्मा या कंपनीमध्ये कारखान्यामध्ये रसायन गळती ची घटना घडली या रसायन गळती नंतर निर्माण झालेल्या रासायनिक वायूमुळे १८ कामगार सायंकाळी उशिरा बाधित झाल्याने त्यांना उपचारासाठी खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे दरम्यान कंपनीकडून वायुगळतीच्या घटनेची माहिती दडपण्याचा प्रयत्न केला गेला असून प्रशासनाला उशिरा माहिती दिल्याचा आरोप होत आहे.



तारापूर औद्योगिक क्षेत्रातील प्लॉट क्रमांक डी १८ वरील आरती फार्मा लॅब या कंपनीमध्ये रविवारी दुपारी दीड ते पावणेदोन वाजल्याच्या सुमारास डाय मीथाइल सल्फेट हे रसायन टैंकर मध्ये भरले जात असताना टँकर मध्ये असणाऱ्या वेंट लाईन मधून त्याची गळती झाली ही बाब लक्षात आल्यानंतर लागलीच टँकर मध्ये रसायन भरण्याची प्रक्रिया थांबवण्यात आली होती.

कंपनी च्या आवारात सांडलेले डाय मिथाईल सल्फेट ची बाधा होऊ नये या दृष्टीने त्यावर कॉस्टिक सोडा व इतर केमिकलचा मारा कंपनीच्या वरिष्ठ व्यवस्थापन प्रतिनिधींच्या समक्ष करण्यात आला होता द्रव रूपातील वायू टँकर मध्ये भरताना गळती होऊन बाहेरील हवेशी संपर्क झाल्याने तसेच सांडलेल्या रसान्याचा प्रभाव कमी करण्या दरम्यानच्या प्रक्रियेत घटनास्थळी उपस्थित असलेल्या जवळपास १८ अधिकारी व कामगारांना वायुबाधा झाली.

कंपनी मध्ये गळती व त्यावर आवश्यक उपाययोजना करण्याची प्रक्रिया अडीच वाजल्याच्या सुमारास संपल्यानंतर सर्व कामगार सायंकाळी आपापल्या घरी गेले रात्री सात आठ वाजल्याच्या सुमारास घटनास्थळी उपस्थित असणारे कर्मचारी यांना श्वास घेण्यास त्रास डोळ्यांची जळजळ आणि चुरचुरणे उलटी मळमळ यासारखे त्रास होऊ लागल्याने सर्व बाधितकामगारांना बेटेगाव येथील अधिकारी लाईफ लाईन रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले उपचारासाठी दाखल सर्व कामगारांची प्रकृती स्थिर असून त्यांच्यावर वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली उपचार सुरू असल्याची माहिती औद्योगिक व सुरक्षा संचलनालयाचे माधव तोटेवाड यांनी दिली या अपघात प्रकरणाची बोईसर पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असून कंपनी व्यवस्थापना विरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या घटनेची माहिती औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचलनालय सकाळी प्राप्त झाल्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली.

**महिनाभरात वायुगळतीची तिसरी घटना**
तारापूर औद्योगिक क्षेत्रातील कारखान्यांमध्ये आग स्फोट आणि वायुगळती सारख्या वारंवार होणाऱ्या औद्योगिक अपघाती घटनांमुळे परिसरातील नागरिक आणि कामगारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे महिनाभरात विनायक कॅमेक्स भगेरिया इंडस्ट्रीज आणि आरती फार्मा लॅब या तीन कंपन्यांमध्ये वायुगळतीच्या घटना घडल्या असून शिव इंडस्ट्रीज हे कंपनी आगीमध्ये जळून खाक झाली सततच्या औद्योगिक अपघातांमुळे कामगारांची सुरक्षा धोक्यात आली असून या सर्वांवर नियंत्रण ठेवणारे औद्योगिक व आरोग्य संचालनालय आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण केले जात आहे.

**वायुगळतीची प्रशासनाला उशिरा माहिती**
तारापूर औद्योगिक क्षेत्रातील प्लॉट क्रमांक डी १८ वरील आरती फार्मा लॅब या कंपनीमध्ये रविवारी दुपारी दोन वाजेच्या सुमारास वायू गळती होऊन त्यामध्ये १८ कामगार बाधित झाले मात्र कंपनी व्यवस्थापनाकडून या अपघाताची माहिती दडपण्याचा प्रयत्न केला गेल्याचे सांगण्यात येत आहे औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय बोईसर पोलीस तारापूर अग्निशमन दल यांना रसायन गळतीमुळे झालेली वायू वाधा संदभार्तील माहिती उशिरा देण्यात आल्याचा आरोप कंपनी व्यवस्थापना विरोधात होत आहे.

# दक्षिण मुंबईतील 'आकांक्षी शौचालय' प्रकल्पाचे बांधकाम संशयाच्या भोवऱ्यात

## महापालिका अधिकारी चौकशीच्या फेऱ्यात

■**मुंबई। प्रतिनिधी,**

दक्षिण मुंबईतील 'आकांक्षी शौचालय' प्रकल्पाचे सुरु असलेले बांधकाम तात्काळ थांबवण्यात यावे तसेच आकांक्षी शौचालय संदभार्तील प्रलंबित चौकशी अहवाल त्वरित सादर करावा आणि सरकारी निदेर्शांचे उघडपणे उल्लंघन करणाऱ्या महापालिका अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी भाजप नगरसेवक मकरंद नार्वेकर यांनी केली आहे. दक्षिण मुंबईतील 'आकांक्षी शौचालय' प्रकल्पाबाबत जुलै २०२५ मध्ये महाराष्ट्र विधानसभेत उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिलेल्या आश्वासनाचे हे गंभीर उल्लंघन आहे. चौकशी पूर्ण होईपर्यंत सर्व कामे स्थगित ठेवण्याचे स्पष्ट निर्देश असूनही प्रत्यक्षात काम पुन्हा सुरू करण्यात आले आहे. हे राज्य सरकारच्या आदेशांचा उघडपणे अवमान असून, विशेषाधिकार भंगाचा विषय ठरू शकतो, असे मकरंद नार्वेकर यांनी सांगितले. त्यामुळे सरकारी आदेशांचे उल्लंघन करून प्रकल्प पुढे नेणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशीही मागणी मकरंद नार्वेकर यांनी केली आहे.




विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि मुंबई महापालिकेचे आयुक्त भूषण गगराणी यांना मकरंद नार्वेकर यांनी लिहिलेल्या पत्रात त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना कोणतीही विलंब न करता सर्व बांधकाम तात्काळ थांबवण्याची मागणी केली आहे. निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांवर ३० दिवसांत अहवाल सादर करण्याचे आश्वासन देण्यात आले होते.

# १ एप्रिलपासून एटीएम नियमांत बदल!

## यूपीआय व्यवहारही मोजले जाणार, फ्री लिमिटनंतर २३ रुपये शुल्क

■**मुंबई। प्रतिनिधी,**

१ एप्रिलपासून देशभरात एटीएम व्यवहारांबाबत काही महत्त्वाचे बदल लागू होणार आहेत. नवीन आर्थिक वर्षाच्या सुरुवातीपासून एचडीएफसी बँक, पंजाब नॅशनल बँक आणि बंधन बँकसह अनेक बँकांनी पैसे काढण्याच्या नियमांमध्ये बदल जाहीर केले आहेत. या बदलांचा थेट परिणाम ग्राहकांच्या दैनंदिन एटीएम वापरावर होणार आहे.



**यूपीआय द्वारे पैसे काढणंही आता 'फ्री लिमिट'मध्ये**
या बदलांमधील सर्वात महत्त्वाचा निर्णय म्हणजे यूपीआय-आधारित एटीएम व्यवहार. आतापर्यंत कार्डशिवाय पैसे काढणे वेगळ्या प्रकारात गणले जात होते. मात्र, आता अशा व्यवहारांनाही मासिक इफ्री ट्रान्झॅक्शन लिमिटश्मध्ये समाविष्ट करण्यात येणार आहे. त्यामुळे यूपीआय वापरून एटीएम मधून पैसे काढल्यास तेही फ्री व्यवहारांमध्ये मोजले जाणार आहेत.

**फ्री लिमिटनंतर २३ रुपये शुल्क**
ग्राहकांना दर महिन्याला ठराविक संख्या फ्री ट्रान्झॅक्शनची सुविधा मिळते. सध्या बँकेच्या एटीएममध्ये साधारण ५ फ्री ट्रान्झॅक्शन मिळतात. इतर बँकांच्या एटीएममध्ये मेट्रो शहरांमध्ये ३ आणि नॉन-मेट्रो शहरांमध्ये ५ व्यवहार मोफत असतात. ही मयार्दा ओलांडल्यानंतर प्रत्येक आर्थिक व्यवहारासाठी २३ रुपये (कर वगळून) शुल्क आकारले जाणार आहे.

**पंजाब नॅशनल बँककडून पैसे काढण्याच्या मयार्देत बदल**
पंजाब नॅशनल बँकेने काही डेबिट कार्डसाठी दैनंदिन पैसे काढण्याच्या मर्यादेत बदल केले आहेत. काही कार्डावरील मर्यादा १,००,००० रुपयांवरून ५०,००० रुपये करण्यात आली आहे, तर काही कार्डावरील मर्यादा १,५०,००० रुपयांवरून ७५,००० रुपये करण्यात आली आहे.

**बंधन बँकचे नवे नियम**
बंधन बँकेनेही एटीएम व्यवहारांसाठी नवे नियम जाहीर केले आहेत. स्वतःच्या एटीएममध्ये ग्राहकांना दर महिन्याला ५ आर्थिक व्यवहार मोफत मिळणार आहेत, तर नॉन-फायनान्शियल व्यवहारांवर कोणतीही मर्यादा नाही. इतर बँकांच्या एटीएममध्ये मेट्रो शहरांमध्ये ३ आणि नॉन-मेट्रो शहरांमध्ये ५ मोफत व्यवहारांची मयार्दा असेल. या मयार्देनंतर आर्थिक व्यवहारासाठी २३ रुपये आणि नॉन-फायनान्शियल व्यवहारासाठी १० रुपये शुल्क आकारले जाणार आहे. तसेच, खात्यात पुरेशी रक्कम नसल्याने व्यवहार फेल झाल्यास २५ रुपये शुल्क आकारले जाईल.

**कार्डशिवाय पैसे काढण्याची सुविधा वाढतेय**
यूपीआय-आधारित एटीएम व्यवहारांमुळे आता डेबिट कार्डशिवायही पैसे काढणे शक्य झाले आहे. ग्राहक दफकोड स्कॅन करून मोबाईलद्वारे व्यवहार पूर्ण करू शकतात. ही सुविधा अधिक सोपी आणि जलद असल्याने तिचा वापर वाढत आहे.

**डिजिटल व्यवहारांना चालना**
या बदलांमधून बँका डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन देत असल्याचे स्पष्ट होते. मोठ्या व्यवहारांसाठी यूपीआय, नेट बँकिंग किंवा इतर डिजिटल पयार्यांचा वापर करण्याचा सल्ला ग्राहकांना दिला जात आहे.

**ग्राहकांनी काय लक्षात ठेवावे?**
या नव्या नियमांनुसार ग्राहकांनी आपल्या डेबिट कार्डची मर्यादा तपासणे, मासिक व्यवहारांची संख्या लक्षात ठेवणे आणि अनावश्यक शुल्क टाळण्यासाठी नियोजन करून अळटचा वापर करणे गरजेचे आहे. १ एप्रिलपासून लागू होणाऱ्या एटीएम नियमांमुळे यूपीआय व्यवहारही फ्री लिमिटमध्ये मोजले जाणार आहेत. मर्यादा ओलांडल्यास अतिरिक्त शुल्क भरावे लागणार असून, काही कार्डावरील पैसे काढण्याची मयार्दाही कमी करण्यात आली आहे. त्यामुळे ग्राहकांनी वेळेत माहिती घेऊन आपला व्यवहार अधिक नियोजनपूर्वक करणे आवश्यक आहे.

# दूध भेसळखोरांना आता 'मोक्का'

## अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांनी विधानपरिषदेत केली घोषणा

■**मुंबई। प्रतिनिधी,**

दुधामध्ये भेसळ करून सर्वसामान्यांच्या आरोग्याशी खेळणाऱ्यांविरुद्ध आता महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा म्हणजेच 'मोक्का' अंतर्गत कारवाई केली जाईल, अशी घोषणा अन्न व औषध प्रशासन (एफडीए) मंत्री नरहरी झिरवाळ यांनी सोमवारी विधान परिषदेत केली. अन्नपदार्थांमधील भेसळीची प्रकरणे सरकारने अत्यंत गांभीर्याने घेतली असून दोषींवर कठोर कायदेशीर तरतुदी लागू करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान डॉ. मनीषा कायंदे आणि कृपाल तुमाने यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना झिरवाळ यांनी ही माहिती दिली.



नुकत्याच अंधेरी परिसरात करण्यात आलेल्या कारवाईचा दाखला देत त्यांनी सांगितले की, एफडीए आणि पोलिसांच्या संयुक्त पथकांनी सात ठिकाणी छापे टाकून दूध भेसळीसाठी वापरले जाणारे साहित्य जप्त केले आहे.

सरकारकडून राबवल्या जाणाऱ्या या मोहिमेमुळे भेसळ करणाऱ्यांचे रॅकेट उद्ध्वस्त करण्यास मदत होणार असून लोकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

**तपास यंत्रणांना अधिक अधिकार देणार**

राज्यातील जनतेला शुद्ध आणि दर्जेदार दूध मिळावे यासाठी सरकार कटिबद्ध असून, यापुढे अशा गुन्ह्यांमध्ये सापडणाऱ्यांवर थेट संघटित गुन्हेगारीच्या कलमांनुसार गुन्हे दाखल केले जातील. यामुळे भेसळ करणाऱ्यांवर वचक बसेल आणि तपास यंत्रणांना अधिक अधिकार मिळतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

**रॅकेटमध्ये सहभागी अधिकाऱ्यांवर कारवाई करणार**
चर्चेत सहभागी होताना सर्वपक्षीय सदस्यांनी एफडीए अधिकारी आणि भेसळ करणाऱ्यांमध्ये साटेलोटे असल्याचा आरोप केला. प्रशासनातील काही कर्मचाऱ्यांच्या आशीवार्दानेच हे अवैध धंदे सुरू असल्याकडे सदस्यांनी लक्ष वेधले. यावर उत्तर देताना मंत्र्यांनी सभागृहाला आश्वस्त केले की, या रॅकेटमध्ये सहभागी असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याची गय केली जाणार नाही आणि त्यांच्यावरही कडक कारवाई केली जाईल.

# आखाती संघर्षाचा मच्छीमारांना फटका... 'बल्क कन्ज्युमर' वर्गीकरणामुळे संताप

## डिझेल दरवाढीने मासेमारी व्यवसाय ठप्प

■**भाईंदर। प्रतिनिधी,**

मध्यपूर्वेतील इराण-इस्रायल संघर्षाच्या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत झालेल्या वाढीचा थेट परिणाम महाराष्ट्राच्या किनारपट्टीवर दिसू लागला आहे. डिझेलच्या दरात प्रति लिटर तब्बल २३ रुपयांची वाढ झाल्याने राज्यातील मच्छीमार बांधवांवर मोठे आर्थिक संकट ओढवले असून, मासेमारी व्यवसाय ठप्प होण्याच्या मार्गावर आहे.



मासेमारीसाठी डिझेल हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. एका बोटीला एका फेरीसाठी सुमारे २ ते ३ हजार लिटर डिझेल लागते. यापूर्वी सुमारे ९० रुपये प्रति लिटर असलेला दर आता ११३ ते ११४ रुपयांपर्यंत पोहोचला आहे. त्यामुळे एका ट्रिपमागे सुमारे ४२ हजार रुपयांचा अतिरिक्त खर्च मच्छीमारांना सहन करावा लागत आहे. आधीच जाळे, शिसे व इतर साहित्याच्या वाढत्या किमतींमुळे अडचणीत असलेल्या मच्छीमारांचे कंबरडे या दरवाढीने मोडले आहे.

या संकटात भर म्हणजे केंद्र सरकारच्या धोरणानुसार मच्छीमार सहकारी संस्थांना 'बल्क कन्ज्युमर' (मोठा ग्राहक) म्हणून वगीर्कृत करण्यात आले आहे. त्यामुळे रेल्वे, एसटी व मोठ्या कंपन्यांप्रमाणेच दर आकारले जात असून, पेट्रोल पंपावरील दरापेक्षा प्रति लिटर २२ ते २३ रुपये अधिक मोजावे लागत आहेत. शहरांमध्ये वाहनधारकांना कमी दरात डिझेल उपलब्ध असताना अन्नसाखळीला हातभार लावणाऱ्या मच्छीमारांना मात्र जास्त दराने इंधन घ्यावे लागत असल्याने कोळीवाड्यांत संताप व्यक्त होत आहे.

वेस्ट कोस्ट पर्ससीन नेट फिशिंग असोसिएशनचे सचिव रमेश नाखवा यांनीही परिस्थिती गंभीर असल्याचे सांगितले. पेट्रोल पंपावर कमी दराने इंधन उपलब्ध असले, तरी मोठ्या प्रमाणावर ते बोटींमध्ये भरणे व्यवहार्य नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, मासेमारीसाठी सरकारकडून दिल्या जाणाऱ्या डिझेल अनुदानाचा परतावा वेळेवर मिळत नसून, त्यासाठी मच्छीमारांना ३ ते ४ वर्षे प्रतीक्षा करावी लागत असल्याने आर्थिक अडचणी अधिकच वाढल्या आहेत. यापूर्वी मच्छीमार व शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र 'तिसरा प्रवर्ग' तयार करण्याची मागणी करण्यात आली होती; मात्र त्यावर अद्याप निर्णय झालेला नाही. सरकारने डिझेल दरातील तफावत तातडीने दूर केली नाही, तर मासेमारीतून मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा इंधनाचा खर्च अधिक होईल आणि मच्छीमारांना समुद्रात जाणेही शक्य होणार नसल्याचे अखिल महाराष्ट्र मच्छिमार कृती समितीचे उपाध्यक्ष प्रदीप टपके यांनी स्पष्ट केले आहे.

"२०२२ मधील रशिया-युक्रेन युद्धाच्या वेळीही अशीच परिस्थिती निर्माण झाली होती. त्यावेळी मच्छीमार आणि शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र 'तिसरा प्रवर्ग' निर्माण करण्याची मागणी करण्यात आली होती; मात्र त्यावर अद्याप कायमस्वरूपी निर्णय झालेला नाही."
**-बर्नार्ड डिमेलो, कार्याध्यक्ष समिती**

"शहरातील वाहनधारकांना कमी दरात डिझेल मिळत असताना देशाच्या अन्नसाखळीत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या मच्छीमारांना अधिक दराने इंधन घ्यावे लागत आहे. ही केवळ दरवाढ नसून राज्यातील सुमारे ३.६ लाख मच्छीमारांच्या उपजीविकेवर घाला आहे."
**-देवेंद्र दामोदर थंड, अध्यक्ष महाराष्ट्र मच्छिमार कृती समिती**

"मच्छीमार संस्थांना 'बल्क कन्ज्युमर' वर्गातून तातडीने वगळण्याची मागणी केली आहे. तोपर्यंत डिझेल खरेदी टाळण्याचे आवाहन करण्यात आले असून, निषेध म्हणून काही ठिकाणी तेल कंपन्यांचे टँकर परत पाठवण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. डिझेल अनुदानाचा परतावा वेळेवर मिळत नसून, त्यासाठी मच्छीमारांना ३ ते ४ वर्षे प्रतीक्षा करावी लागते."
**-प्रदीप नाखवा, अध्यक्ष करंजा मच्छीमार सहकारी संस्था**

# 100 हून अधिक गुंतवणूकदारांना गंडा

## चांगल्या परताव्याचे आमिष दाखवून 8 कोटींची फसवणूक

■**मुंबई। प्रतिनिधी,**

गुंतवणुकीवर चांगला परतावा देण्याचे आमिष दाखवून शंभरहून अधिक गुंतवणुकदारांची सुमारे आठ कोटींची फसवणूक करून कंपनीचे दोन्ही संचालक पळून गेल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. कौशल पुरोहित आणि कुणाल पुरोहित अशी दोन्ही आरोपींची नावे असून त्यांच्याविरोधात आझाद मैदान पोलीस ठाण्यात अपहारासह फसवणूक तसेच महाराष्ट्र ठेवीदाराच्या अधिनियम कायदा कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पळून गेलेल्या दोन्ही संचालकाच्या अटकेसाठी पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेतली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, 32 वर्षांचे तक्रारदार ज्वेलर्स व्यापारी असून त्यांचा सोने आणि हिरे खरेदी विक्रीचा व्यवसाय आहे. त्यांनी मरिनलाईन्स येथील पुरोहित यांच्या कंपनीच्या प्रकल्पात काही




रक्कमेची गुंतवणूक केली होती. या गुंतवणुकीवर त्यांना पंधरा टक्के परताव्याचे आमिष दाखविण्यात आले होते. ठरल्याप्रमाणे 2012 ते मार्च 2019 या कालावधीत कंपनीने त्यांना परतावा दिला होता. त्यामुळे त्यांच्यासह इतरांनी मोठ्या प्रमाणात पुरोहित यांच्या प्रकल्पाच्या कंपनीमध्ये गुंतवणूक केली होती. मात्र मार्च 2019 नंतर पुरोहित यांच्या कंपनीने तक्रारदाराला गुंतवणुकीवर परतावा देणे बंद केले होते. महत्त्वाचे म्हणजे चौकशीदरम्यान पुरोहित यांच्या कंपनीच्या प्रकल्पात सुमारे शंभरहून अधिक लोकांनी कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक केली होती. त्यानंतर दोन्ही संचालकांनी जवळपास आठ कोटींची फसवणूक करून पळ काढला आहे.

पुरोहित यांच्या कंपनीत ज्या ब्रोकर कंपनीच्या मदतीने गुंतवणूक होत होती, त्या ब्रोकर कंपनीचीही फसवणूक करण्यात आली आहे. हा प्रकार उघडकीस येताच तक्रारदार ज्वेलर्स व्यापार्याने आझाद मैदान पोलिसात तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीनंतर कौशल पुरोहित आणि कुणाल पुरोहित यांच्याविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. मात्र गुन्हा दाखल होण्यापूर्वीच ते दोघेही पळून गेले आहेत. त्यामुळे पोलिसांकडून त्या दोघांचा शोध सुरू आहे. या कंपनीच्या प्रकल्पात अनेकांनी मोठ्या प्रमाणात गुंतवणुक केली आहे, त्यामुळे फसवणुकीचा हा आकडा आणखीन वाढण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.




# शिरवली येथे सापडला महिलेचा मृतदेह

■**वसई। प्रतिनिधी,**

वसई तालुक्यातील मांडवी पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका २५ ते ३० वर्षीय अज्ञात महिलेची निर्घृण हत्या झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. मारेकर्याने धारदार शस्त्राने महिलेचा गळा चिरून आणि डोक्याला गंभीर दुखापत करून तिच्या हत्या करून मृतदेह शिरवली गावातील एका शेतात फेकून दिला आहे.

वज्रेश्वरी ते शिरसाड जार्णाया मुख्य रस्त्यापासून साधारण ३० मीटर अंतरावर २१ मार्च रोजी दुपारी विरार पूर्वेच्या शिरवली येथील रमेश घरत यांच्या शेतात एका अज्ञात महिलेचा मृतदेह आढळून आला होता. या घटनेमुळे आजूबाजूच्या परिसरात मोठी खळबळ उडाली होती. याची माहिती तात्काळ मांडवी पोलिसांना देण्यात आली. माहिती मिळताच मांडवी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रणजित आंधळे यांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेहाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविला. याप्रकरणी सुरुवातीला या प्रकरणी मांडवी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली होती. मात्र, चौकशीदरम्यान हा घातपाताचा प्रकार असल्याचे निष्पन्न झाल्याने पोलिसांनी आता खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. महिला सावळ्या रंगाची असून तिने अंगात गुलाबी रंगाची फुल बाह्यांची लेगीज आणि त्यावर पांढर्या नक्षीचा पिवळसर रंगाचा टॉप घातला आहे. अद्याप तिची ओळख पटलेली नाही. अज्ञात आरोपीने कोणत्या कारणासाठी आणि कोणत्या शस्त्राने तिची हत्या केली याचा शोध घेण्यासाठी चार पथके व गुन्हे शाखेचे पथक असा समांतर तपास सुरू केला असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक रणजित आंधळे यांनी दिली आहे.

# नोकरीचे आमिष दाखवून महिलेवर अत्याचार

## पतीकडून उकळले १० लाख रुपये... डोंबिवलीतील धक्कादायक प्रकार

■**डोंबिवली। प्रतिनिधी,**

डोंबिवलीतून अतिशय धक्कादायक प्रकार समोर आला आहे. रहिम पद्मसी,करीम जैन आणि करण जोशी अशा तीन नावांचा वापर करणाऱ्या या नराधमाने रेल्वेत नोकरी लावण्याचे आमिष दाखवून एका महिलेवर अत्याचार केला. तसेच तिच्या पतीलाही रेल्वेचं कंत्राट देतो असं सांगून त्याच्याकडून १० लाख रुपये उकळले. व्याजावर पैसै वसूल करण्याच्या बदल्यात महिलांकडे शरीर सुखाची मागणीही केल्याचा धक्कादायक प्रकार या आरोपीनं केल्याचं उघडकीस आलंय. रामनगर पोलीस ठाण्यात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, त्याचा जामीन अर्ज आज कल्याण जिल्हा सत्र न्यायालयाने फेटाळून लावला आहे. या प्रकरणात तो फरार असल्याची माहिती फियार्दीच्या वकिलांनी दिली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, आरोपीने महिलेला नोकरी लावण्याचं आमिष दाखवून तिला घरी बोलावलं. त्यानंतर तिला गुंगीचं औषध देऊन तिच्यावर बलात्कार केला.तसच तिचा व्हिडीओ आणि फोटो काढून तिला दाखवलं. हा प्रकार कोणाला सांगितला तर, फोटो आणि व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी त्याने दिली.पीडितेला सतत धमकी देऊन आरोपी काही वर्षे तिच्यावर अत्याचार करत राहिला.

**महिलेच्या पतीला बसला मानसिक धक्का**
पीडित महिलेच्या पतीच्या लक्षात आलं की,आरोपी त्याची फसवणूक करत आहे. पत्नीमुळे पती त्याच्या संपर्कात आला होता. पतीने पत्नीला फसवणूक झाल्याचे सांगितले. त्यानंतर पत्नीनेही पतीला तिच्यासोबत घडलेला प्रकार सांगितला. त्यानंतर पतीला जबर मानसिक धक्का बसला. पती पत्नीने पोलिस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली. तक्रारीच्या आधारे रामनगर पोलिसांनी रहीम पद्मसी उर्फ करीम मोहंमद जैन उर्फ करम जोशी याच्या विरोधात ८ मार्च रोजी गुन्हा दाखल केला. पोलिसांनी आरोपीला अद्याप अटक केलेली नाही. आरोपीने कल्याण न्यायालयात अटक पूर्व जामीन मिळावा यासाठी अर्ज केला होता. आरोपीचा जामीन अर्ज फेटाळला असल्याची माहिती फियार्दीचे वकिल महेश शिवदास यांनी दिली आहे. धक्कादायक म्हणजे फरार आरोपी हा व्याजावर पैसै देतो. अनेक महिलांना त्याने व्याजी पैसे दिले आहेत. व्याजी पैशाच्या वसुलीसाठी तो संबंधित महिलांकडे शरीर सुखाची मागणी करतो, असा आरोप संबंधित महिलांकडून करण्यात आला आहे. त्या महिलांनी आरोपीविरोधात तक्रार करण्यसाठी पोलीस ठाण्यात धाव घेतली आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००0१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com